DAILY THANEVAIBHAV RNI REGD NO. 27878/ 75, POSTAL NO. THC/186/2018-2021



ठाणेवैभव
अधिक बातम्यांसाठी आमच्या
वेबसाइटला भेट द्या
www.thanevaibhav.in

# ठाणेवैभव

www.thanevaibhav.in

ठाणे जिल्ह्याचे सर्वाधिक खपाचे परिपूर्ण दैनिक | इष्ट ते छापणार | संस्थापक : नरेन्द्र बल्लाळ

रविवार विशेष
आधारवड
➤➤पान ३ वर



भारतीय सौर दिनांक कार्तिक २ शके १९४४ | वर्ष ४७ | अंक ५८ | रविवार २४ ऑक्टोबर २०२१ | पाने ६ | रु. ४ | संपादक : मिलिन्द बल्लाळ

# जबरदस्तीचे पुनर्वसन सहन करणार नाही

## दिव्यात रस्ता रुंदीकरणातील शेकडो रहिवाशांचा इशारा

**ठाणे:** दिवा-शीळ मुख्य रस्त्यावर दिवा पूर्व आणि दिवा पश्चिमला जोडणाऱ्या उड्डाणपुलाच्या बांधणीसाठी ठाणे महापालिकेच्या वतीने दिवा स्टेशन रोड रस्त्याचे रुंदीकरण करण्यात येत आहे. या रस्ता रुंदीकरणात जवळ जवळ 22 इमारती बाधित होत असून त्यामध्ये राहणारे 350 कुटुंब आणि 120 गाळे धारकांना याचा फटका बसणार आहे.



**या नागरिकांचे ठाणे महापालिकेच्या पडले गावातील बीएसयुपी प्रकल्पात पुनर्वसन करण्यात येणार असे सांगितले जात आहे. हा प्रकल्प शहरापासून लांब असून मुलांच्या शाळा, विद्यालय, नोकरी व व्यवसायाच्या ठिकाणी पोहचणे वेळकाढू आणि खर्चिक आहे. शिवाय पडले गावातील प्रकल्पासून मुख्य शहराकडे वा दिवा स्टेशनला येण्यासाठी कोणतीही सार्वजनिक वाहतूक व्यवस्था उपलब्ध नाही. त्यामुळे या ठिकाणी जाण्यास रहिवाशांचा सक्त विरोध आहे.**

मागील तीन वर्षांपासून पालिका प्रशासन रहिवाशांवर दबाव टाकून घरे खाली करण्यास सांगत आहे. रहिवाशांनी वेळोवेळी याचा विरोध केला आहे. रहिवाशांची बाजू ऐकून घ्यावी यासाठी त्यांनी एकदिवसीय लाक्षणिक उपोषण, मानवी साखळी,

➤➤पान २ वर

# कोविड सेंटरमध्ये परिचारिकेचा विनयभंग

## आरोपी फरार

**भाईंदर:** मीरा-भाईंदर महापालिकेच्या भाईंदर पूर्वेकडील न्यु गोल्डन नेस्ट परिसरात असलेल्या कोविड केयर सेंटरमध्ये कंत्राटी सुपरवाईजरने कंत्राटी परिचारिकेचे लपून विवस्त्र अवस्थेतील व्हीडिओ मोबाईलमध्ये काढून तो व्हायरल करण्याची धमकी देत तिला ब्लॅकमेल केल्याची घटना नुकतीच उघडकीस आली आहे.

घटनेनंतर आरोपी फरार झाला असून नवघर पोलीस ठाण्यात त्याच्याविरोधात 14 ऑक्टोबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस आरोपीचा शोध घेत असून या घटनेचा गवगवा होऊ नये, यासाठी प्रशासनाकडून काळजी घेतली जात होती. मात्र घटनेचा तपशील हाती लागल्याने त्या कोविड केयर सेंटरमधील सुरक्षा व्यवस्था पुन्हा एकदा चव्हाट्यावर आली आहे. 2020 मध्ये याच कोविड सेंटरमध्ये एका कंत्राटी कर्मचाऱ्याने महिला कोविड रुग्णांवर अत्याचार

➤➤पान २ वर

## उल्हासनगरातील खळबळजनक घटना

# फ्लॅट विक्रीवरून प्रॉपर्टी दलालांचा वयोवृद्ध महिलेवर जीवघेणा हल्ला

**उल्हासनगर:** फ्लॅट विक्रीच्या सौद्यावरुन प्रॉपर्टी दलालांनी एका 70 वर्षीय वयोवृद्ध महिलेवर चाकूने जीवघेणा हल्ला केल्याची खळबळजनक घटना उल्हासनगरातील विठ्ठलवाडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली आहे.



कॅम्प नंबर 4 मधील कारा मोटरसमोर अलंकार अपार्टमेंट आहे. या अपार्टमेंटमध्ये मधू गोवलानी या वयोवृद्ध महिलेचा फ्लॅट असून त्यांनी तो विक्रीस काढला होता. शेजारी राहणाऱ्या इसमाने प्रॉपर्टी दलालांच्या माध्यमातून या फ्लॅटचा सौदा केला होता. एक लाख रुपयांचा धनादेश दिला होता. तो बाऊन्स झाल्यावर 40 हजार रुपये रोख दिले होते. तीन महिन्यात संपूर्ण रक्कम दिली नाही तर दिलेले ॲडव्हान्स परत मिळणार नाही असा करार प्रॉपर्टी दलालांनी फ्लॅट विक्री करणाऱ्या आणि

➤➤पान २ वर




# खोटारड्या ठाकरे सरकारमुळे शेतकऱ्याची `दिवाळी काळी'!

## आमदार संजय केळकर यांची संतप्त प्रतिक्रिया

**ठाणे:** ठाकरे सरकारच्या नाकर्तेपणामुळे राज्यातील हजारो शेतकरी कुटुंबांच्या घरात ऐन दिवाळीत अंधार पसरला असून शेतकऱ्यांची दिवाळी काळी झाली आहे. मुख्यमंत्री केवळ हे मुंबईचेच मुख्यमंत्री आहेत का..? असा सवाल आज महाराष्ट्रातील शेतकरी करत आहेत, अशी संतप्त प्रतिक्रिया भाजपचे ठाण्याचे आमदार संजय केळकर यांनी पत्रकार परिषदेत पत्रकारांशी संवाद साधताना दिली.

यावेळी ठाणे ग्रामीण जिल्हाध्यक्ष किसन कथोरे आणि ठाणे जिल्हाध्यक्ष आ. निरंजन डावखरे,

➤➤पान २ वर

# दिवाळीत कोपरी उड्डाणपुलावर होणार वाहतूक कोंडी

## जुन्या दोन मार्गिकांचे काम वर्षभर



(छाया- गजानन हरिमकर)

**ठाणे:** कोपरी उड्डाणपुलाच्या मधल्या जुन्या दोन मार्गिकांचे काम येत्या आठवड्यात हाती घेण्यात येणार आहे. हे काम जवळपास वर्षभर सुरु राहणार आहे. त्यामुळे ऐन दिवाळीत आणि त्यानंतर वर्षभर या मार्गावर वाहतूक कोंडीचा सामना प्रवाशांना करावा लागणार आहे.

पूर्व द्रुतगती महामार्गावरुन दिवसाला

➤➤पान २ वर



पान १ वरुन

## जबरदस्तीचे पुनर्वसन सहन करणार नाही

धरणे आंदोलन, संबंधित अधिकाऱ्यांच्या भेटीगाठी असे अनेक मार्ग अवलंबले, पण प्रशासन त्यांची बाजू ऐकायला तयार नाही. उच्च न्यायालयाने सर्व बाधित रहिवाशांची सुनावणी घेऊन बाजू ऐकावी आणि त्यानंतरच पुढील कार्यवाही करावी असे आदेश दिले असताना सुद्धा बाधित रहिवाशांचे म्हणणे ऐकले जात नाही, असा आरोप नागरिक करत आहेत.

रस्ता रुंदीकरणात बाधित होणाऱ्या जागा मालकांना कोणतीही पूर्वसूचना न देता वा कोणत्याही प्रकारची भुसंपादन प्रक्रिया न राबवता रस्ता रुंदीकरण केले जात आहे. जागा मालकाला आपल्या जमिनीचा मोबदला आताच्या नवीन कायद्यानुसार मिळावा अशी शेतकऱ्यांची मागणी प्रलंबित असताना जबरदस्तीने रुंदीकरण केले जात आहे. चुकीच्या पद्धतीने सुनावणी आयोजित करून रहिवाशांना धमकी दिली गेली. अचानक एक दिवस अगोदर सुनावणीची नोटीस देऊन सुनावणी घेण्यात आली. सुनावणीत रीतसर आणि संपूर्ण बाजू मांडायला मिळावी याकरिता रहिवाशांनी मुदतीसाठी लेखी अर्ज दिले असतानाही परस्पर आदेश पारीत करण्यात आला आहे.

जबरदस्ती करून वा पोलीस बळाचा वापर करून घरे खाली केल्यास सामूहिक आत्मदहनाशिवाय पर्याय नसेल व त्याला पालिका प्रशासन जबाबदार असेल, असा इशारा नागरिकांनी दिला आहे.

## दिवाळीत कोपरी उड्डाणपुलावर होणार वाहतूक कोंडी

वाहने मुंबई-ठाण्याच्या दिशेने ये-जा करत असतात. या मार्गिकेवरील कोपरी रेल्वे पूल हा अत्यंत अरुंद असल्याने दररोज सकाळी आणि रात्रीच्या वेळेत पूर्व द्रुतगती मार्गावर वाहतूक कोंडीचा सामना वाहन चालकांना सहन करावा लागतो. तसेच मुंबई आयआयटीनेही हा पूल जुना झाल्याने पूलाची दुरूस्ती करण्याची सूचना केली होती. त्यानुसार, 2018 मध्ये या मार्गावर पूलाची उभारणी तसेच अतिरिक्त मार्गिका तयार करण्याचे काम एमएमआरडीए आणि मध्य रेल्वे प्रशासनाकडून सुरु आहे. मध्य रेल्वेकडून रेल्वे रूळांवरील भागाची बांधणी केली जात आहे. तर, एमएमआरडीएकडून पोहोच रस्त्याचे काम केले जात आहे. जून महिन्यात येथील ठाण्याच्या दिशेने येणारी आणि मुंबईच्या दिशेने जाणारी अतिरिक्त मार्गिका उभारण्यात आलेली आहे. तब्बल साडेतीन वर्षांनी या पुलाच्या दोन्ही बाजूकडील प्रत्येकी दोन अशा चार मार्गिकांचे नुकतेच नगरविकास मंत्री तथा पालकमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते लोकार्पण झाले. त्याप्रसंगी बोलताना, पालकमंत्र्यांनी पहिल्या टप्प्यातील चार मार्गिका कार्यान्वित झाल्यानंतर उर्वरित मधील चार मार्गिकांचे काम देखील रेल्वे आणि एमएमआरडीएच्या माध्यमातून लवकरच हाती घेतले जाणार आहे. तर या कामासाठी जास्तीत जास्त येत्या वर्षभरात मधील चार मार्गिकांचे काम पूर्ण केले जाईल असेही पालकमंत्र्यांनी त्यावेळी बोलताना स्पष्ट केले होते.

येत्या आठवड्यात दोन मार्गिका असलेला जुना कोपरी पुल वाहतुकीसाठी बंद होणार असल्याने या पट्ट्यात मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होण्याची शक्यता आहे. पहिल्या टप्प्यात उभारलेल्या चार मार्गिकांमुळे सकाळी टोलनाक्यावर आणि सायंकाळी तीन हात नाका परिसरात वाहतुकी कोंडी होताना दिसत आहे. ऐन दिवाळीच्या तोंडावर पूल वाहतुकीला बंद केल्यामुळे जणू ठाण्यात कोंडीचा धमाका होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

पुलाचे काम हाती घेतल्याने कोंडी होणार असल्याने सकाळी आणि सायंकाळी काही वेळेसाठी तसेच काही ठिकाणी वाहतुकीत बदल केला जाणार आहे. यावेळी कोंडी टाळण्यासाठी अतिरिक्त आठ ते दहा वाहतुक पोलिसांची फौज तैनात असणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

कामामुळे सकाळी 8 ते 11 या दरम्यान तीन हात नाका-भास्कर कॉलनी हा सर्व्हीस रोड वन वे राहणार आहे.तसेच तोच रस्त्या सायंकाळी 5 ते रात्री 9 वाजेपर्यंत वन वे केला जाणार आहे. तर मुंबईतून येणाऱ्या दुचाकी आणि थ्री व्हीलर या आनंद नगर सर्व्हीस रोडने ठाण्यात येतील. तर मुंबईत जाणारी आणि येणारी चार चाकी आणि अवजड वाहने नव्या पुलाच्या मार्गिकेने ये- जा करतील.

# भाजपाप्रमाणे इतर राजकीय पक्षांवरही गुन्हा दाखल करा-सभागृह नेते

**भाईंदर :** मीरा-भाईंदर शहराला भेडसावत असणाऱ्या भीषण पाणी टंचाईच्या निषेधार्थ भारतीय जनता पक्षाने रस्त्यावर उतरुन जनआंदोलन केल्यानंतर भाजपाचे माजी आमदार नरेंद्र मेहता, महापौर ज्योत्स्ना हसनाळे, उपमहापौर हसमुख गहलोत यांच्यासह भाजपाच्या नगरसेवक तथा पदाधिकाऱ्यांविरोधात गुन्हा दाखल करणाऱ्या पोलीस यंत्रणेने याच विषयावर आंदोलन करणाऱ्या अन्य राजकीय पक्षांविरोधात देखील गुन्हा दाखल करावा, अशी मागणी मीरा-भाईंदर महानगरपालिकेचे सभागृह नेते प्रशांत दळवी यांनी केली आहे.



मीरा-भाईंदरला जाणवत असलेल्या पाणी टंचाई विरोधात मिरा रोड येथे आंदोलन करुन कोरोना नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी मिरा भाईंदरच्या महापौर ज्योत्स्ना हसनाळे, उपमहापौर हसमुख गहलोत आणी माजी आमदार नरेंद्र मेहता यांच्यासह भाजप नगरसेवक आणि कार्यकर्त्यांवर पोलिसांनी काशिमिरा पोलीस स्टेशन अंतर्गत गुन्हे दाखल केलेले आहेत.

मीरा-भाईंदरला जाणवणाऱ्या पाणी टंचाई विरोधात भारतीय जनता पक्षाने गुरुवारी जन आंदोलन करण्याचा इशारा दिला होता. यात मिरा रोड ते दहिसर चेकनाका पदयात्रा आणि नंतर मुंबईतील एमआयडीसी कार्यालया बाहेर धरणे आंदोलन असे हे आंदोलन केले जाणार होते. नागरिकांनाही यात सामील होण्याचे आवाहन भाजपकडून करण्यात आले होते. मात्र कोरोनाच्या पार्श्वभुमीवर मीरा-भाईंदर शहरात जमावबंदीचे आदेश लागू आहेत. पाचपेक्षा जास्त व्यक्तींना सार्वजनिक ठिकाणी एकत्र येण्यास मनाई आहे. आंदोलन झाल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल, अशा नोटीसा पोलिसांनी भाजप पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांना बजावल्या होत्या. मात्र त्यानंतरही गुरुवारी सकाळी भाजपचे नगरसेवक, पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने मीरा रोडच्या सिल्वर पार्क भागात जमा झाले होते. यावेळी नेत्यांनी भाषणेही केली. त्यामुळे मनाई आदेशांचे उल्लंघन तसेच कोरोना नियमांचे पालन न केल्याप्रकरणी काशीमिरा पोलिसांनी महापौर ज्योत्स्ना हसनाळे, उपमहापौर हसमुख गेहलोत, माजी आमदार नरेंद्र मेहता यांच्यासह भाजप नगरसेवक आणि पदाधिकारी अशा 79 तसेच 250 अज्ञात व्यक्तींवर गुन्हा दाखल केला आहे.

मीरा-भाईंदर शहरात निर्माण झालेल्या भीषण कृत्रिम पाणी टंचाईच्या निषेधार्थ शिवसेना, काँग्रेस आणि मनसे यांच्यावतीने देखील आंदोलन छेडण्यात आले होते. मात्र या आंदोलनकर्त्यांविरोधात कोणत्याही प्रकारचा गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही. केवळ भाजपाच्या नेत्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. हा भाजपावर झालेला अन्याय असून पोलीस प्रशासनाने निष्पक्ष:पातीप्रमाणे अन्य राजकीय पक्षांच्या नेत्यांविरोधात देखील गुन्हा दाखल करावा, अशी मागणी सभागृह नेते प्रशांत दळवी यांनी पोलीस आयुक्त सदानंद दाते यांच्याकडे केली आहे.

## खोटारड्या ठाकरे सरकारमुळे शेतकऱ्याची 'दिवाळी काळी'!



### राज्यातील शेतकऱ्यांबाबत मंत्रिमंडळात चकार शब्दही नाही'

**लखीमपूरच्या घटनेनंतर मंत्रिमंडळाच्या बैठकीत शोक व्यक्त करून महाराष्ट्र बंदला पाठिंबा देणाऱ्या महाविकास आघाडीला राज्यात अतिवृष्टीच्या संकटात सापडलेल्या आणि नैराश्यातून आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांविषयी द्वेष का? संकटग्रस्त शेतकऱ्यास सहानुभूती दाखविणारा एक शब्दही मंत्रिमंडळाच्या बैठकीत का काढला जात नाही? असा सवालही त्यांनी केला.**

प्रदेश सचिव संदिप लेले, ठाणे ग्रामीण सरचिटणीस नितीन मोपे उपाध्यक्ष सागर भदे आदी उपस्थित होते.

महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची बिकट परिस्थिती ठाकरे सरकारला लक्षात यावी या करिता महाराष्ट्रात अशा विविध जिल्ह्यात पत्रकार परिषद आयोजितक केल्या असल्याची माहिती आ. केळकर यांनी दिली.

नुकतेच अतिवृष्टी ने कोकणात हा हाकार माजवला. महाड, चिपळूण सारख्या अनेक भागातील अनेक कुटुंबांचे, दुकानदार व्यापाऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले. ठाकरे सरकारने या लोकांना मदत जाहीर केली तर व्यापाऱ्यांना तातडीने विमा कंपनीस 50% विमा अदा करण्याचे आदेश दिले. परंतु हे आदेश केवळ कागदावरच राहिले, कोणालाही एक छदाम मदत मिळाली नाही. मुख्यमंत्र्यांच्या आदेशालाच केराची टोपली दाखवली जाते. महाराष्ट्रातील शेतकरी हा अत्यंत बिकट परिस्थितीत आहे पण ठाकरे सरकार केवळ वसुलीच्या मागे लागले आहे, केवळ घ्यायचे, पण द्यायचे नाही अशी वृत्ती असणारे सरकार शेतकऱ्यांना मदत करेल का असा शेतकऱ्यांना प्रश्न आहे असे ही आ. केळकर यांनी पत्रकार परिषदेत बोलताना सांगितले.

अतिवृष्टीमुळे राज्यातील 55 लाख हेक्टरहून अधिक शेतजमिनींवरील पिकांचे नुकसान झाल्याची सरकारची प्राथमिक आकडेवारी आहे. प्रत्यक्षात 100 लाख हेक्टरहून अधिक जमिनीवरील पिके पूर्ण नष्ट झाली आहेत आणि पुरामुळे शेतजमिनी नापीक झाल्या आहेत. जमिनींचा कस संपल्यामुळे पुढील दहा वर्षे तरी कोणत्याही पिकाची शाश्वती राहिलेली नाही आणि ठाकरे सरकार हेक्टरी दहा हजार रुपयांच्या फसव्या मदतीची पाने पुसून शेतकऱ्याची थट्टा करत आहे. जाहीर केलेल्या मदतीपैकी फुटकी कवडीदेखील शेतकऱ्यापर्यंत पोहोचलेली नसल्याने राज्यातील शेतकरी नैराश्यग्रस्त झाला आहे. त्यातून आत्महत्यांचे प्रमाण वाढत असल्याने ठाकरे सरकार म्हणजे शेतकऱ्यांचे बळी घेणारे सरकार ठरले आहे. या दुःखामुळे हजारो शेतकरी कुटुंबांची दिवाळी अंधारात जाणार असून, मातोश्री, वर्षा आणि मंत्रालय मात्र रोषणाईने उजळणार आहे. ठाकरे सरकारला जरादेखील लाज असेल, तर यंदाची दिवाळी शेतकऱ्याच्या दुःखाची दिवाळी म्हणून जाहीर करून मातोश्री व वर्षावर रोषणाई न करण्याचे मुख्यमंत्र्यांनी जाहीर करावे, असे आवाहन आमदार किसन कथोरे व आमदार निरंजन डावखरे यांनी केले.

अतिवृष्टीमुळे सोयाबीनचे पीक हातचे गेले असताना, या पिकाच्या मोठ्या उत्पन्नाचे आमीष दाखवून हजारो शेतकऱ्यांची दिशाभूल केली. भेसळयुक्त खते, निकृष्ट बियाणे आणि फसवणुकीमुळे शेतकरी अगोदरच पिचला असताना, अतिवृष्टीमुळे हातचे पीक वाया गेल्यावर मात्र ठाकरे सरकार मूग गिळून गप्प आहे, असा आरोप श्री. कथोरे व श्री. डावखरे यांनी केला.

कोकण आणि विदर्भातील धानाच्या पिकाचीही प्रचंड हानी झाली आहे. ऊसाबाबत सरकारचे धोरण कारखानदारांच्या धार्जिणे असल्याने ऊस उत्पादकांनाही सरकारने वाऱ्यावर सोडले आहे. चहूबाजूंना कोंडीत सापडलेल्या शेतकऱ्यासाठी सरकारच्या संवेदना मात्र संपल्या आहेत. संकटांनी वेढलेल्या सामान्य जनतेसाठी काहीही न करता केवळ सरकार स्थिर असल्याची निरर्थक व जनतेशी देणेघेणे नसलेले राजकारण करण्यात सरकारचे मंत्री गर्क आहेत. अमली पदार्थांच्या विरोधातील कारवाईच्याविरोधात मोहीम उघडणाऱ्या सरकारला शेतकऱ्यांची दुःखे जाणून घेण्यात रस नसल्याने जनतेचा सरकारवरील विश्वास उडाला आहे, अशी टीका श्री. कथोरे व श्री. डावखरे यांनी केली.

## मोटरसायकल चोरीच्या गुन्ह्यात तडीपार असणाऱ्या दोघांना अटक

**कल्याण :** कल्याण गुन्हे अन्वेषण विभागाच्या पथकाने मोटरसायकल चोरी प्रकरणातील तडीपार असणाऱ्या दोन चोरांना सापळा रचून जेरबंद करण्यात यश मिळवले आहे.

ऋतिक घरत आणि विक्रम पाटील अशी अटक आरोपींची नावे आहेत. त्यांच्याकडून एक दुचाकी जप्त केली आहे. तळोजा रोडवरील रोहिंजण गावात मानपाडा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मोटारसायकल चोरीमधला पाहिजे असलेला आरोपी रहात असल्याची माहिती कल्याण गुन्हे अन्वेषण विभागाच्या पथकाला मिळाली. त्यानुसार पथकाने सापळा रचून रात्री त्या दोघांच्या मुसक्या आवळून बेड्या ठोकल्या. त्यांच्यावर मानपाडा पोलीस ठाण्यात मोटरसायकल चोरीचे एकूण तीन गुन्हे दाखल असून ठाणे शहर, ग्रामीण, पालघर, नवी मुंबई या विविध पोलीस ठाण्यांतर्गतही चोरीचे अनेक गुन्हे दाखल असण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे.

कल्याण गुन्हे अन्वेषण विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मनोहर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक भूषण दायमा, पोलीस उपनिरीक्षक मोहन कळमकर, सचिन साळवी, अनुप कामत, राहुल ईशी आदींच्या पथकाने विशेष मेहनत घेऊन उपरोक्त दोन आरोपींना अटक केली आहे.

## रामबाग-जोशीबाग परिसरात साप आणि घोरपडीचा सुळसुळाट

**कल्याण :** गेल्या काही दिवसांपासून कल्याण पश्चिमेतील रामबाग व जोशीबाग परिसरात मोठ्या प्रमाणात साप व घोरपड निघत असल्याने परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे.



गेल्या आठवड्यामध्ये या परिसरात राहणाऱ्या सर्पमित्र सतीश बोबडे यांनी घोरपड पकडली असून एक घोरपड चार फुटाची दुसरी घोरपड दीड फुटाची आहे. परिसरात राहणाऱ्या महिलेच्या घरात घोरपड असल्याची माहिती सतीश बोबडे यांना मिळतात त्यांनी दोन्ही घोरपड पकडून वन विभाग अधिकारी यांच्या स्वाधीन केले आहे. सर्पमित्र सतीश बोबडे यांच्या माहितीनुसार स्टेशन परिसरात असलेल्या पोलीस लाईन मध्ये लोकवस्ती नसल्याने या ठिकाणी मोठ्या प्रमाणात झाडे वाढली असून यामध्ये सरपटणारे प्राण्यांची वाढ झाली आहे तेथूनच हे घोरपड व साप लोकवस्तीमध्ये येत आहेत.

# पत्रकारावर हल्लाः भाजपा नगरसेविकेचा भाऊ अटकेत

**भाईंदर :** मीरा-भाईंदर येथील स्थानिक युवा पत्रकार भाविक पाटील यांना नाहक बेदम मारहाण करणाऱ्या भाजपाशी संबंधित नगरसेविका अनिता पाटील यांचा भाऊ राजेश श्यामलाल चौहान या भूमाफियाला काशिमीरा पोलीसांनी आज तात्काळ अटक केली आहे.

पत्रकार भाविक पाटील हे पेणकर पाडा येथे राहतात आज सकाळी वृत्तसंकलनार्थ पाटील आपल्या अ‍ॅक्टीवा गाडी वरुन जात असताना राजेश चौहान याने त्याच्या गाडीसमोर आलेल्या भाविक पटेलला दमदाडी आणि शिवीगाळ केली तसेच तद्नंतर बेदम मारहाण ही केली. या घटनेचे वृत्त समजताच मीरा-भाईंदर महानगरपालिका वार्ताहर संघाचे अध्यक्ष राजू काळे यांच्यासह अनेक पत्रकारांनी काशिमीरा पोलीस स्टेशनला धाव घेतली. काशिमीरा पोलीस स्टेशनचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक संजय हजारे यांची भेट घेतली.

या घटनेचे गांभिर्य लक्षात घेता हजारे यांनी महाराष्ट्र राज्यातील प्रसार माध्यमातील व्यक्ती आपली कर्तव्ये पार पाडत असताना त्यांच्यावर होणाऱ्या हिंसक कृत्यांना प्रतिबंध करण्यासाठी आणि प्रसार माध्यमातील व्यक्ती किंवा प्रसार माध्यम संस्था यांच्या मालमत्तेचे नुकसान किंवा हानी होण्यास प्रतिबंध करण्यासाठी तसेच तदसंबंधित बाबींसाठी तरतूद करण्यासाठीचे अधिनियम 2019 कायद्यात करण्यात आलेल्या तरतूदीच्या अनुषंगाने राजेश चौहान यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला असून त्याला तात्काळ अटक केली आहे.

राजेश चौहान याने पेणकर पाडा क्षेत्रातील शासकीय जागेवर अवैध रित्या कब्जा केला असून येथे असंख्य झोपड्या बांधल्या आहेत मात्र मीरा-भाईंदर महानगरपालिकेने या संदर्भात राजेश चौहान या भूमाफियाच्या विरोधात आजतागायत एमआरटीपी अंतर्गत गुन्हा दाखल केलेला नाही. इतकेच नव्हे तर याच राजेश चौहान चे पेणकर पाड्यात एक हॉटेल असून ते देखील अनधिकृत बांधकाम आहे. पत्रकार भाविक पाटील यांच्यावर झालेल्या हल्ल्याची दखल घेत आयुक्त दिलीप ढोले यांनी हॉटेलच्या बेकायदा बांधकामावर कारवाई करण्याचे आदेश उपायुक्त मारुती गायकवाड यांना दिली आहेत.

## स्मशानभूमीतील बत्ती गुल झाल्याने मृतदेहावरील अंत्यसंस्कारासाठी विलंब

**कल्याण:** कल्याणमध्ये रात्रीच्या वेळेस एका मृत महिलेच्या अंत्यविधीसाठी नागरीकांना स्माशन भूमीतील बत्ती गुल असल्याने ताटकळत उभे राहावे लागले.

कल्याण पूर्व भागातील विठ्ठलवाडी परिसरात मोक्षधाम ही स्मशानभूमी आहे. खडेगोलवली परिसरातील एका वयोवृद्ध महिलेचा मृत्यू झाल्याने तिच्यावर अंत्यसंस्कार करण्यासाठी तिचा मृतदेह घेऊन तिचे नातेवाईक स्माशानभूमीत गेले. स्मशानभूमीतील बत्ती गुल झाली होती. स्मशानभूमीत एकच कर्मचारी उपलब्ध होता. त्याला विचारण्यात आले की, वीज का नाही. त्याच्याकडे उत्तर नव्हते. लोकांनी अंधारात महिलेच्या अंत्यविधीची प्रक्रिया सुरु केली. अर्ध्या तासानंतर त्याठिकाणी एक व्यक्ती आला. त्याने वीज पुरवठा सुरळित केला. या घटनेमुळे नागरीकांनी नाराजी व्यक्त केली आहे. समाजसेवक राहूल काटकर यांनी याबात पत्राद्वारे आयुक्तांना कळवित स्माशनभुमीतील वीज पुरवठा कसा सुरळीत राहील याबाबत मागणी करीत, नागरीकांची होणारी गैरसोय दूर करण्याची मागणी केली आहे.

## फ्लॅट विक्रीवरून प्रॉपर्टी दलालांचा वयोवृद्ध महिलेवर जीवघेणा हल्ला

घेणाऱ्या यांच्यात केला होता. तीन महिने संपल्यावर गोवलानी यांनी ऍडव्हान्स रुपये देण्यास नकार करताच काल प्रॉपर्टी दलाल गणेश सुहंदा आणि त्याचा साथीदार हे मधू गोवलानी यांच्या घरी आले. घरात एकट्या असलेल्या गोवलानी यांच्याशी वादविवाद झाल्यावर त्यांनी त्यांच्यावर चाकू हल्ला करून पळ काढला.

चाकू हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या मधू गोवलानी यांना खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या प्रकरणी विठ्ठलवाडी ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक कन्हैया थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली दलाल गणेश सुहंदा याला अटक करण्यात आली असून त्याच्या जोडीदाराचा शोध घेण्यात येत आहे.

## कोविड सेंटरमध्ये परिचारिकेचा विनयभंग

केल्याची घटना घडली होती. त्यावेळी या घटनेचे खापर तेथील सुरक्षा व्यवस्थेवर फोडण्यात येऊन आयुक्त दिलीप ढोले यांनी सुरक्षा रक्षक पुरविणाऱ्या कंपनीलाच हद्दपार केले. आणि त्यांच्या जागी महाराष्ट्र सुरक्षा बल नामक कंपनीला महाराष्ट्र राज्य सुरक्षा रक्षक महामंडळाच्या नावावर नियुक्त करून पालिका वास्तूंतील सुरक्षा कवच अभेद्य केले. पालिकेच्या या कोविड सेंटरमध्ये तत्कालीन मेसर्स सिटीजन अलाईड प्रा. लि. या ठेकेदार कंपनीचा कंत्राटी सुपरवाईजर कंपनीचे कोणतेही काम पालिकेत सुरु नसताना बेकायदेशीरपणे वास्तव्य करीत होता. मात्र त्याचा थांगपत्ता तेथील सुरक्षा यंत्रणेला नसल्याचे आश्चर्य वाटते. आरोपीच्या खोलीलगतच पालिकेत कंत्राटावर काम करणारी परिचारिका वास्तव्य करीत होती. येथील खोल्यांच्या बाहेरील बाजूस व्हेंटिलेशनसाठी काचेच्या स्लाइड्स तसेच एक्झॉस्ट फॅन बसविण्यात आल्याने त्याच्या सापटीतून पांडे आपल्या मोबाईलमध्ये लपून त्या परिचारिकेचे कपडे बदलतानाचे विवस्त्र अवस्थेतील व्हीडिओ काढत होता. त्याची कुणकुण लागताच त्या परिचारिकेने, तो त्याच्या खोलीत असताना त्याचा मोबाईल घेत दरवाज्याला कडी लावून त्याला आत कोंडून ठेवले. तीने त्याचा मोबाईल तपासला असता त्यात तीचे विवस्त्रावस्थेतील व्हीडिओ असल्याचे तिच्या निदर्शनास आले. तीने तात्काळ त्याची माहिती वरिष्ठांना दिली. वरीष्ठांच्या निर्देशानुसार तीने 14 ऑक्टोबर रोजी नवघर पोलीस ठाण्यात पांडे विरोधात गुन्हा दाखल केला आहे. या घटनेनंतर आयुक्त नव्याने ठेका दिलेल्या सुरक्षा कंपनीचे कंत्राट रद्द करणार का, असा प्रश्न उपस्थित झाला असून या कंपनीला सुरुवातीला 3 महिन्यांसाठी सुरक्षा रक्षक पुरविण्याचा ठेका दिला होता पण तो पुढे एक वर्षासाठी वाढविण्यात आला आहे.

## आसरा दिला नाही म्हणून नेपाळी सुरक्षारक्षकावर हल्ला

**ठाणे:** घरामध्ये आसरा दिला नाही म्हणून नेपाळी सुरक्षारक्षकावर चाकूने हल्ला केल्याची घटना खारकर आळी परिसरात घडली. हल्लेखोरांनी सुरक्षारक्षकाचा कोथळाच बाहेर काढला असून पोलिसांनी त्याला अटक केली आहे.

खारकर आळी येथील नीलम हौसिंग सोसायटी येथे पद्मबहादूर थकोला (49) हा सुरक्षेचे आणि पाणी सोडण्याचे काम करतो. तो मूळचा नेपाळ येथील आहे. काल दुपारी 3.45च्या दरम्यान त्याच्या ओळखीचा इंद्रमोहन भरमले हा आला होता. त्याने पद्मबहादूर याला त्याच्या घरात आसरा देण्याची आणि जेवण करण्याची विनंती केली. परंतु त्यास सुरक्षा रक्षकाने नकार दिला. त्यावरून दोघांमध्ये प्रचंड वाद झाला. त्याचे पर्यावसान शिवीगाळ आणि हाणामारीत झाले. इंद्रमोहन याने त्याच्याकडे असलेल्या चाकूने पद्मबहादूर याच्या पोटावर वार करून कोथळा बाहेर काढला. या भागातील जागरूक नागरिकांनी पोलीस नियंत्रण कक्षाला या घटनेची माहिती दिली. ठाणेनगर पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.

गंभीर जखमी असलेल्या पद्मबहादूर याला कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. त्याच्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली असून त्याची स्थिती गंभीर असल्याचे ठाणे नगर पोलिसांनी सांगितले. या गुन्ह्याचा पुढील तपास ठाणे नगर पोलीस करत आहेत.


जाहीर नोटीस

मै श्री इन्द्रजीत प्रसाद रामपत कनोजिया, रा. रुम नं. ११, गिरधर चाल, साधुबेला शाळे, बॅरेक नंबर १३८ बी समोर, उल्हासनगर - १, मो. नं. ९८२२८५३३८१, इस पब्लिक नोटीस द्वारा सभी आम व खास नागरिकों को सूचित करता हूँ कि, मेरा मेरे पुत्र श्री. सचिन इंद्रजीत प्रसाद कनोजिया, उम्र २६ वर्ष से कोई भी हक वास्ता नही है । मैने मेरे पुत्र श्री सचिन इंद्रजीत प्रसाद कनोजिया को उसके कुकृत्यो के कारण मैने उसे अपने घर से निकाल दिया है । तथा अपने सभी संबंध तोड दीये है, तथा अपने सभी तरह अधिकारो से वंचित कर दिया है । उसे मेरे द्वारा अर्जित संपत्ती में कोई एक किस प्रकार का अधिकार नही है । मैने मेरे उपरोक्त पुत्र को अपने से बेदखल कर दिया है। अगर कोई भी व्यक्ति उससे व्यवहार करता है तो वह स्वयम् ही उसका जिम्मेदार होगा। उपरोक्त कथन सत्य है, इसीलिए मै अपने नाम और हस्ताक्षर से आम जनता के सूचनार्थ, समाचार पत्र से प्रकाशित कर रहा हूँ ।

हस्ताक्षर /-

इंद्रजीत प्रसाद रामपत कनौजिया



# सचिनदादा भोसले यशोगाथा

**प्रिय सचिन दादा भोसले,**

काही माणसं जन्माला येतानाच समाजसेवेचं आणि जनकल्याणाचं ब्रीद घेऊनच जन्माला येत असतात. अशाच ध्येयवेड्यांपैकी एक म्हणजे तुम्ही, हा माझा तुमच्या बाबतीतला विश्वास आता दिवसेंदिवस दृढ होत चालला आहे. ह्या गोष्टीचा विचार किंवा तुमच्या ह्या कौतुकाची ही हुक्की माझ्या मनात आता अचानकच आलेली नाही की कुणीही माझ्या डोक्यात हा विचार पेरललेला नाही. गेल्या बऱ्याच काळापासून मला तुमच्या बाबतीत हे सगळं जे काही मी आता बोलतो आहे ते तीव्रतेने वाटते आहे. तुमचे तोंड भरून कौतुक करावेसे वाटते आहे आणि आजच्या ह्या संधीचा मी आज पुरेपूर वापर करून घेणार आहे.

संकटाच्या काळात लोकांच्या पाठीशी हमखास उभं राहण्याची तुमची वृत्ती मला नवीन मुळीच नाही. पण तुमच्या ह्या समाजसेवेच्या वेडाचं प्रत्यक्ष दर्शन आम्हां सगळ्यांनाच ह्या गेल्या कोविडच्या काळात घडलं. कोरोनाच्या काळात ज्यांच्या ज्यांच्यावर संकटं कोसळली त्या सगळ्यांसाठी तुम्हांलाच खुद्द देवाने त्यांचा संकटहारी म्हणून पाठवल असावं. कारण ह्या काळात गोर-गरिबांना, गरजूंना तुम्ही अन्न वाटप केलं, कुणाकुणाला भाजीपाला,



जेवण सामग्री वगैरे देऊ केलीत. गोकुळदास वाडी मध्ये ह्या कठीण काळात जेव्हा रक्तदानासाठी तुम्ही आवाहन केलंत तेव्हा तुमच्या एका हाकेवर लोकांनी रक्तदानासाठी धाव घेतली. त्यात जातीने लक्ष घालून तुम्ही रक्तदान शिबीर घेतलत. आपल्या परिसरात लोकांच्या काळजीपोटी तुम्ही मोफत आरोग्य शिबीर चालवले. त्यात उत्तर भारतीय बंधू-भगिनींना तुम्ही त्यांच्या घरी जाण्यासाठी आवश्यक असलेले आरोग्य दाखले मोफत देऊ केले. शासनातर्फे सुचविण्यात आलेल्या अर्सेनिकच्या रोगप्रतिकारक शक्ती असलेल्या गोळ्या आपल्या विभागात मोफत वाटल्या. तसेच विभागात जिथे जिथे गरज असेल तिथे तुम्ही औषधफवारणी, स्वच्छतेची काळजी, लोकांच्या आरोग्याची काळजी वगैरे गोष्टी ह्या बाबतीत तुम्ही दाखवलेली कार्यतत्परता तर तुमच्या बद्दलचा आमच्या मनातला आदर वाढवतेच.

कोरोना काळात तुम्ही केलेल्या कामामुळे अनेक लोकांचे जीव वाचले, अनेक तातातूट झालेल्या लोकांना त्यांच्या माणसांशी त्यांच्या कुटुंबियांशी भेटवून दिलंत, महाराष्ट्रातील विविध ठिकाणच्या पूरग्रस्तांना आपण सढळ हाताने मदत केलीत. ह्या संकटामुळे नोकरी गेलेल्यांना मदत करून त्यांचा आर्थिक प्रश्न सोडवलात. तुमच्या अशा सगळ्याच कामांची यादी वाचायला इथली जागा पुरणार नाही, पण तुमची ही जनतेबद्दलची आत्मीयता आणि लोकांसाठी काम करायची तळमळ आमच्या आणि ह्या जनतेच्या मनात खूप पक्की होत आहे. खरेच अतिशयोक्ती नाही पण तुमच्यात असलेले हे सगळे गुण पाहता तुमच्या मध्ये ध्येयासक्त समाजसेवक मला स्पष्ट दिसतो आहे, बाकी सध्या तुम्ही 'त्या' पदावर नसलात तरी काम मात्र 'त्या'च जबाबदारीने, जाणीवेने आणि आत्मियता करता आहात.... प्रत्यक्ष जबाबदारी खांद्यावर पडल्यावर तुम्ही ती यशस्वीपणे पेलालच, ह्यात शंकेला तिळमात्र जागा नाही....

तुमच्या पुढील यशस्वी वाटचालीसाठी तुम्हांला 'ऍडव्हान्स' शुभेच्छा...!

**- राजेश कदम, खोपट**



हरवले आहे

तमाम जनतेस या नोटीशीव्दारे कळविण्यात येते की आमचे अशिल श्रीम. रिना शिरीष म्हात्रे रा.- बी-६०५, ब्लू हेवन, रहेजा विहार, चांदिवली स्टुडियो जवळ, पवई, मुंबई -४०००७२ यांचे मौजे कुळगाव ता. अंबरनाथ, जि. ठाणे येथील कनिष्क संकुल को-ऑप. हौ. सो. लि. मधील सदनिका क्र. ई-१४/२, तळमजला, क्षेत्रफळ ५५० चौ. फुट या सदनिकेचे मे. कनिष्क इस्टेट प्रा. लि. व श्रीम. श्यामा प्रसाद यांचेमधील खरेदीचे मूळ नोंदणीकृत दस्त नं. ३००/१९९४ हे मूळ दस्त कोठेतरी पडून गहाळ झाले असून त्याची तक्रार बदलापूर पू. पोलिस स्टेशनमध्ये घराचे मूळ कागदपत्र गहाळ मिसींग रजि नं. ७२३/२०२१ कडे आमचे अशिल यांनी दाखल केली आहे. सबब सदरचे कागदपत्रे कोणालाही आढळल्यास नमुद पत्त्यावर येत्या २१ दिवसांमध्ये प्रदान करावे ही विनंती.

पत्ता : ऑफिस नं ००१, तळमजला, अदिती प्लाझा को ऑप हौ सो, हेंद्रेपाडा, बदलापुर (प.), ता अंबरनाथ, जि ठाणे मो नं : ९५९४२६४५९७

सही/-
अ‍ॅड.सौ. शुभांगी म. पाटील



CLASSIFIEDS ठाणेवैभव

छोट्या जाहिरातींसाठी संपर्क कार्यालय ठाणे - २५३४१५२६/२५३४८५९४

**ऑफिस भाड्याने देणे आहे**

टोटल कार्पेट एरिया, ११५८.६७ स्क्वे.फु., ३ कॅबिन, १ रिसेप्शन, १ पॅन्ट्री, २ बाथरूम टेरेस सोबत शिवनेरी बिल्डिंग, पहिला माळा, गावदेवी, ठाणे रेल्वे स्टेशनजवळ. ८९७६८२३७५२

**विकणे आहे**

टेंभी नाका परिसरात २०० आणि २५० चौ.फूटाचा बेसमेंट गाले विकायला आहे.
संपर्क - ९८१९२४९२८०

**WANTED**

Male Accounts Assistant 12th or Graduate pass for a Showroom at Thane
Contact : 9820441155 or 9820118786 Email : a1furniture@rediffmail.com

**पाहिजेत**

नामांकित रक्तपेढीसाठी डिलेव्हरीसाठी (बाईक असणाऱ्यास प्राधान्य) मुले पाहिजेत. पत्ता - ब्लडलाईन ब्लड बँक, आंबेडकर रोड, खोपट, ठाणे (प)
संपर्क - ०२२-२५३७५०००/ ६०००

**'ठाणेवैभव' दैनिकातील जाहिराती या जाहिरातदारांनी दिलेल्या मजकुरानुसार छापल्या जातात. या मजकुराच्या सत्यतेबाबतची खातरजमा वाचकांनी स्वतःच्या जबाबदारीवर करावयाची आहे. 'ठाणेवैभव' यांचा याबाबत कोणतीही आर्थिक वा कायदेशीर प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष जबाबदारी राहणार नाही.**


'ठाणेवैभव' हे दैनिक मालक-मुद्रक-प्रकाशक मिलिन्द बल्लाळ यांनी मिड-डे इन्फोमिडिया लि., R/847/3, टी.टी.सी. इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी रबाळे, नवी मुंबई-४००७०१. महाराष्ट्र येथे छापून दामले अपार्टमेंट, टेंभीनाका, ठाणे (प) महाराष्ट्र -४००६०१ येथे प्रकाशित केले.
दूरध्वनी नं. २५३४१५२६,२५३४८५९४ Email : thanevaibhav1975@gmail.com

# आधारवड

**मोतिबिंदू हळूहळू विकसित होतो. सुरुवातीला मोतिबिंदूचा दृष्टीवर कोणताही परिणाम होत नाही; परंतु काळाबरोबर मोतिबिंदू हळूहळू व्यक्तीच्या दृष्टिक्षमतेवर परिणाम करू लागतो. अशा व्यक्तीला आपली दिनचर्याही पार पाडण्याइतकेही दिसत नाही. आपल्या दिनचर्येत आपण मोतिबिंदूची प्रारंभिक लक्षणे ओळखायला हवीत.**

## मोतिबिंदूवर करा उपचार

उतारवयातील लोकांमध्ये मोतिबिंदू ही डोळ्यांची प्रमुख समस्या आहे आणि जवळजवळ प्रत्येकाला आयुष्यात या समस्येचा सामना करावाच लागतो. आपल्या देशात दरवर्षी मोतिबिंदूचे २० लाख रुग्ण दरवर्षी आढळून येतात. बहुतांश वेळा मोतिबिंदू हळूहळू विकसित होतो. सुरुवातीला मोतिबिंदूचा दृष्टीवर कोणताही परिणाम होत नाही; परंतु काळाबरोबर मोतिबिंदू हळूहळू व्यक्तीच्या दृष्टिक्षमतेवर परिणाम करू लागतो. अशा व्यक्तीला आपली दिनचर्याही पार पाडण्याइतकेही दिसत नाही. आपल्या दिनचर्येत आपण मोतिबिंदूची प्रारंभिक लक्षणे ओळखायला हवीत. दूरचे किंवा जवळचे कमी दिसू लागले, गाडी चालविण्यात अडचण येऊ लागली, चष्म्याच्या नंबरमध्ये अचानक बदल झाला किंवा जर तुम्हाला एखाद्याच्या चेहऱ्यावरील हावभाव ओळखू येईनासे झाले तर लक्षात घ्यावे की तुमच्या डोळ्यांत मोतिबिंदू विकसित होत आहे. अशा स्थितीत तातडीने डॉक्टरांना भेटून डोळ्यांची तपासणी करावी. कारण जेवढ्या लवकर मोतिबिंदूची शस्त्रक्रिया केली जाईल, तितका उत्तम परिणाम दिसून येईल. जगात सर्वाधिक केली जाणारी आणि सर्वाधिक यशस्वी ठरणारी अशी ही शस्त्रक्रिया आहे.

कॅमेऱ्याच्या भिंगाप्रमाणे (लेन्स) डोळ्यांतसुद्धा पारदर्शक लेन्स असते. हे लेन्स प्रकाश किंवा प्रतिमा रेटिनावर फोकस करण्यास सहाय्यभूत ठरतात. रेटिनावर स्पष्ट प्रतिमा पडावी यासाठी लेन्स पारदर्शक असणे गरजेचे असते. जेव्हा लेन्सवर डाग पडतात आणि ते धूसर पडते तेव्हा प्रकाश या लेन्समधून पूर्ण क्षमतेने आत पोहोचू शकत नाही आणि प्रतिमा अस्पष्ट दिसू लागतात. या कारणामुळे दृष्टीवर झालेला परिणाम म्हणजे मोतिबिंदू होय. हिंदीमध्ये याला मोतियाबिंद किंवा सफेद मोती असे म्हणतात. मोतिबिंदूने त्रस्त असलेल्या व्यक्तींना वाचन करण्यात, काम करण्यात, रात्रीच्या वेळी गाडी चालविण्यात अडचणी येतात. रात्री गाडी चालविताना समोरून येणाऱ्या गाडीच्या हेडलाइटमुळे डोळे दिपून जातात. काहीजण दुहेरी दृष्टीची तक्रार करतात.

वाढत्या वयाबरोबर डोळ्यांच्या लेन्समध्ये जे प्रथिन असते, ते पांढरे पडू लागते. काही अन्य घटकही मोतिबिंदूची जोखीम वाढविणारे ठरतात. उदाहरणार्थ, मधुमेह, जास्त दारू पिणे, सूर्यप्रकाश अत्यधिक प्रमाणात डोळ्यांवर पडत राहणे, डोळ्यांना दुखापत होणे किंवा सूज येणे, पूर्वी झालेली डोळ्यांची एखादी शस्त्रक्रिया कार्टिस्टेरॉइड मेडिकेशनचा दीर्घकाळ अवलंब, धूम्रपान आदी कारणांमुळे मोतिबिंदू वाढीस लागू शकतो.

मोतिबिंदूवर शस्त्रक्रिया हा एकमेव उपचार आहे. या शस्त्रक्रियेच्या माध्यमातून अपारदर्शक लेन्स हटवून रुग्णाच्या डोळ्यात नवीन कृत्रिम लेन्सचे प्रत्यारोपण केले जाते. तिला इन्ट्रा ऑक्युलर लेन्स असे म्हणतात. त्यानंतर निर्धारित नंबरचा चष्मा वापरण्याची गरज पडू शकते. अर्थात, बायोफोकल किंवा ट्राय-फोकल लेन्स प्रत्यारोपित केल्यास सर्जरीनंतर दृष्टी पूर्णपणे सामान्य होते आणि चष्मा न वापरताच सर्वकाही स्पष्टपणे दिसू लागते. रोबोटिक कॅटरॅक्ट सर्जरीही अत्यंत हितकारक ठरते.



मोतिबिंदू कसा रोखता येऊ शकेल किंवा मोतिबिंदूच्या विकासाची गती कमी कशी करता येईल, याबाबत कोणतेही प्रमाणित उपाय सांगता येत नाहीत. डॉक्टरांच्या म्हणण्यानुसार, अनेक मार्गांनी आपल्याला मोतिबिंदू रोखण्यास मदत मिळू शकते. त्यात वयाची चाळिशी झाल्याबरोबर डोळ्यांची तपासणी करून घेणे हा पहिला उपाय आहे. सूर्याचे अतिनील (अल्ट्राव्हायोलेट) किरण मोतिबिंदू वाढण्यास कारणीभूत ठरू शकतात. जेव्हा उन्हात बाहेर पडायचे असेल तेव्हा गॉगल परिधान करणे उपयुक्त ठरते. जर तुम्हाला मधुमेह किंवा मोतिबिंदूला खतपाणी घालणाऱ्या अन्य काही व्याधी असतील, तर अशा व्याधींवर त्वरित उपचार घ्यावेत. आपले वजन आटोक्यात ठेवावे. रंगबिरंगी फळे आणि भाज्यांचा समावेश आहारात असावा. यामध्ये बरेच अँटी ऑक्सिडेन्ट घटक असतात आणि डोळे निरोगी राखण्यात ते महत्त्वाची भूमिका बजावतात. धूम्रपान आणि दारूपासून दूर राहावे. ◆◆◆

## सोफ्यावर झोपताय?

पूर्वीच्या काळी आलिशान बंगल्यांमध्येच सोफा दिसायचा. पण हल्ली घराघरात सोफे आले आहेत. त्यात असंख्य व्हरायटी पाहायला मिळतात. सोफ्यावर तासनतास बसून टीव्ही पाहणे, मोबाईल पाहणे हा हल्ली अनेकांचा दिनक्रम बनला आहे. यापुढे जात अनेक जण रात्री सोफ्यावर झोपतातही ! मात्र मंडळी सोफ्यावर सातत्याने झोपल्यास आरोग्याच्या समस्या उद्‌भवू शकतात. कारण सोफ्यावर आरामदायक झोप मिळत नाहीत. कारण ते झोपण्याच्या हेतूने डिझाइनच केलेले नसतात. तसेच बहुतांश सोफ्यांमध्ये फोमचा वापर केलेला असतो. साहजिकच ते पलंगावरील कापसाच्या गाद्यांप्रमाणे उष्णाताही शोषून घेऊ शकत नाही. रोजच्या वापराच्या गाद्या या आरामशीर झोप प्रदान करण्यासाठी तयार केलेल्या असतात. तसे सोफ्याचे नसते.



तसेच सोफ्याचे आकारमान ठरलेले असते. तेवढ्या जागेत अवघडूनच झोपावे लागते. आरामदायक स्थितीमध्ये रात्रभर झोपल्याने शरीराच्या अवयवांमध्ये वेदना होतात. दीर्घकाळ सोफ्यावर झोपल्याने पाठदुखी, मानदुखीची समस्याही भेडसावू शकते. कदाचित हे दुखणे त्वरित जाणवणार नाही; पण कालांतराने ते डोके वर काढेल हे निश्चित. याखेरीज शांत झोप न मिळाल्यामुळे होणारे तोटेही सहन करावे लागू शकतात. त्यामुळे बेडवर झोपायचे नसेल तर एकवेळ खाली सतरंजी, चटई टाकून झोपा. पण सोफ्यावर झोपणे टाळा ! ◆◆◆

**अनेकांना वृद्धावस्था हे एक ओझं वाटू लागतं. पण, आयुष्याकडे आणि वयाच्या या टप्प्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन सकारात्मक असेल तर ते ओझं न वाटता तो एक उत्सव वाटू लागेल.**



## उत्सव उत्तरार्धाचा

आयुर्मानात झालेली वाढ हे एकविसाव्या शतकाचं खास वैशिष्ट सांगितलं जातं. भारतासह साऱ्या जगातील आकडेवारीवर नजर टाकली तर २०५० पर्यंत साऱ्या जगात ६० वर्षांवरील व्यक्तींची संख्या ११ टक्क्यांवरुन २२ टक्क्यांपर्यंत वाढेल. जागतिक आरोग्य संघटनेच्या अंदाजानुसार २०५० पर्यंत वृद्ध लोकांची संख्या ६ कोटी ५० लाखांवरुन २ अब्ज इतकी होईल. वृद्धांची वाढती संख्या लक्षात घेऊन त्या त्या देशांनी वृद्धांसाठी धोरणं बनवली पाहिजेत, असं आवाहन जागतिक आरोग्य संघटनेच्या वतीने करण्यात आलं आहे. या पार्श्वभूमीवर ज्येष्ठांनीही आपल्या आरोग्याबाबत अधिक सतर्क होणं गरजेचं आहे.

आरोग्याच्या दृष्टीने वृद्धावस्थेकडे पाहिलं तर आरोग्याच्या बाबतीत हे वय अतिशय संवेदनशील वय मानलं जातं. वयाच्या पन्नाशीनंतर शरीरामध्ये अनेक प्रकारचं क्रियात्मक परिवर्तन होत असतं. या दरम्यान शरीरातील हाडं, फुफ्फुस इत्यादींची कार्यक्षमता कमी व्हायला लागते. दातही कमकुवत व्हायला लागतात. त्याचप्रमाणे ऐकू येण्याची, दृष्टीची क्षमता, स्मरणशक्ती इत्यादी गोष्टीही कमी व्हायला लागतात. दुसरीकडे अनेक ठिकाणी वृद्धांना आर्थिक स्वातंत्र्यही कमीच मिळतं. त्यामुळे अनेक कुटुंबांमध्ये वृद्ध व्यक्ती हे एक ओझं वाटायला लागतं. अशा परिस्थितीत या काळात आरोग्य आणि सामाजिक पैलूंचं विवेचन होणं गरजेचं आहे.

या दृष्टीने वृद्धांच्या वाढत्या संख्येबाबत आणि त्यांच्या आरोग्याच्या समस्यांबाबत जागतिक आरोग्य संघटनेने चिंता व्यक्त केली आहे. त्यामध्ये केवळ अविकसित देशांतील वृद्धांचाच समावेश नसून विकसित देशातील वृद्धांचाही अंतर्भाव आहे. दोन्ही देशातील वृद्धांच्या समस्यांमध्ये काही साधर्म्य आहे त्याचप्रमाणे काही फरकही आहेत. विकसित देशातील वृद्धांना अपेक्षाकृत आर्थिक समस्या कमी आहेत तर विकसनशिल देशातील वृद्धांना आर्थिक अडचणी हीच मोठी समस्या आहे. विकसनशिल किंवा गरीब देशातील वृद्धांची अवस्था फारच वेदनादायी आहे. त्यामुळे त्या त्या देशातील सरकारने अशा योजना बनवाव्यात की ज्यामुळे वृद्धावस्था हे ओझं वाटता कामा नये, असं आवाहन जागतिक आरोग्य संघटनेनं केलं आहे. अनेक देशांमध्ये वृद्ध व्यक्तींची कार्यकुशलता आणि त्यांच्या अनुभवांचा खजीना याचा लाभ विधायक कामांसाठी करुन घेतला जात आहे. भारततही वृद्धावस्थेकडे सकारात्मक दृष्टीकोनातून पाहिलं जावं यासाठी अनेक स्वयंसेवी संघटनांकडून वेगवेगळ्या प्रकारची अभियानं राबवली जात आहेत. वास्तविक, भारतामध्ये सुरुवातीपासूनच वृद्धावस्थेकडे सकारात्मक दृष्टीने पाहिलं जात आहे. वृद्धाश्रम ही संकल्पना भारतीय नसून ती पाश्चात्य आहे. पण, वृद्धाश्रम हे ज्येष्ठ नागरिकांच्या समस्यांवरचं उत्तर नाही हे आता पाश्चात्त्य राष्ट्रांनाही कळून चुकलं आहे. त्यामुळे जेथे वृद्धांची संख्या जास्त असेल तेथे त्यांचं जीवन सार्थकी लागेल, अशा योजना आखल्या पाहिजेत. या दृष्टीने जागतिक आरोग्य संघटनेने 'वृद्धत्व आणि आरोग्य' ही थीम यावर्षी राबवण्याचं आवाहन केलं आहे. या थीमचा अर्थ आहे 'रिटायर्ड बट नॉट टायर्ड' किंवा वय झालं तरी थकलात असा नाही, असा आहे.

वास्तविक, तंत्रज्ञान आणि आधुनिक विकासाने मानवाला वाढत्या आयुष्याचं वरदान दिलं आहे. पण, यामुळे युवा वर्ग आणि वृद्ध यांच्यामध्ये मोठं अंतर निर्माण झालं आहे. ज्यावेळी कुटुंबांमध्ये सामंजस्य आणि संवेदना यांचा अभाव असतो त्यावेळी वृद्धावस्था हे एक ओझं वाटू लागतं. त्यामुळे समृद्धीबरोबरच संवेदना आणि नैसर्गिक सत्य याकडेही लक्ष देणं आवश्यक आहे. ज्येष्ठ नागरिकांनीही वृद्धावस्था हे संकट न मानता त्याकडे सकारात्मक दृष्टीकोनातून पाहिलं पाहिजे. आपल्या आयुष्यातील राहून गेलेलं छंद पूर्ण करण्यासाठी या काळाचा वापर केला पाहिजे. त्यासाठी नवीन काही शिकण्याचीही तयारी ठेवली पाहिजे. अशा सकारात्क दृष्टीने आयुष्याच्या उत्तरार्धाकडे पाहिलं तर हे वय ओझं न वाटता तो एक उत्सव वाटायला लागेल. ◆◆◆

**कडाक्याच्या थंडीची पहाट असो किंवा पावसाळ्यातील संध्याकाळ असो, वातावरणातील हे बदल ६० हून अधिक पावसाळे पाहिलेल्या ज्येष्ठ नागरिकांवर कमी प्रभाव टाकत नाहीत. त्यांच्यासाठी ऋतुचक्र बदलत नसेल तर या ज्येष्ठ नागरिकांनी तरी रिटायरमेंटरच्या नावाखाली आपल्या जीवनशैलीत मोठा बदल कशासाठी करायचा?**

## दरवळ सिल्व्हर इनिंगचा

रिटायरमेंट हा शब्द मनात येताच आपले खाण्या-पिण्याचे, कमाई करण्याचे दिवस आता संपले आहेत, असं वाटू लागतं. पण, खरोखरच रिटायरमेंट म्हणजे रिकामं बसणं असा त्याचा अर्थ आहे का? नक्कीच नाही! किमान आज रिटायरमेंटला सेकंड इनिंग किंवा सिल्व्हर इनिंग म्हटलं जात असताना त्याचा असा अर्थ काढणं नक्कीच अवघड जाईल. सेकंड इनिंग म्हणजे आयुष्याचा दुसरा टप्पा. जोपर्यंत आपण नोकरी-व्यवसायात असतो तोपर्यंत धावपळीच्या जीवनात दिवस, महिने, वर्ष कशी संपतात ते कळतही नाही.

आयुष्याचा पहिला टप्पा चांगला जाण्यासाठी आपण काय काय करत नाही! कधी कंटाळवाण्या दिनचर्येला वैतागून बदल करण्यासाठी कुटुंबियांसमवेत फिरायला जातो तर कधी रोजच्या त्या धकाधकीच्या आयुष्याचा हिस्सा स्वीकारुन हे आपल्या नियतीनेच लिहून ठेवलं आहे, असा विचार करतो.

आज नातवंडांना खाऊ-पिऊ घालण्याशिवाय आजी-आजोबांकडे इतकी कामं आहेत की, त्यांना रिकामं बसून राहिल्याची जाणीवही होत नाही.



पण, आज रिटायरमेंट शब्दाचा पारंपरिक अर्थ अनेक दृष्टीने वेगाने बदलतो आहे. आज आयुष्याचा दुसरा टप्पाही कमी रोमांचक राहिलेला नाही. निवृत्तीनंतर स्वत:ला कार्यमग्न ठेवण्यासाठी अनेक पर्याय उपलब्ध आहेत.

फ्रेंच लेखिका सिमोन डी ब्यूवॉयर यांच्या म्हणण्यानुसार, तुम्ही निवृत्तीकडे एक आनंददायी दीर्घकालीन सुट्टी किंवा रिकाम्या वेळेच्या रुपात पाहू शकता. आपली रिटायरमेंट या दोघांपैकी नक्की काय आहे, हे आपल्यालाच ठरवायचं आहे.' एक सामान्य गृहिणी ते प्रसिद्ध मॉडेल बनलेल्या दविन्द्र मदान यांनी आपली रिटायरमेंट हा एक सुंदर टप्पा बनवला आहे. आज वयाची ६० वर्ष उलटून गेल्यानंतरही त्यांचं काम सुरु आहे, त्यांच्या नावाची जादू आहे आणि त्यांची व्यस्त दिनचर्या पाहून त्या रिटायरमेंटची मजा घेत आहेत, असं कोणी म्हणू शकत नाही. याविषयी बोलताना मदान म्हणतात, 'माझे पती नेव्हीमधून रिटायर्ड झाले आहेत. आतापर्यंत मी घरच्या साऱ्या जबाबदाऱ्या सांभाळत होते. पण, आता ते रिटायर्ड झाल्यानंतर आणि मुलं मोठी झाल्यानंतर मी स्वत:बद्दल बराच काही विचार केला. मला या वयातही मॉडेलिंगची कामं मिळत आहेत, हे माझं सुदैवच समजेन. याशिवाय मी समाजसेवेची कामंही करते. वाचण्याशिवाय मला इंटरनेट सर्फिंगचीही खूप आवड आहे. आता ज्वेलरी डिझाईन किंवा स्कल्पचरिंगचा कोर्स करावा, असा विचार मी करते आहे. शिकण्यासाठी वयाचं बंधन नसतं, असं मला वाटतं.'

आपली अपूर्ण स्वप्नं साकार करण्यासाठी या वयातही प्रयत्न करणाऱ्या मदान या काही एकट्याच नाहीत. विनोद महाजनही त्यांच्यापैकीच एक आहेत. सरकारी नोकरीतून निवृत्त होऊन त्यांना दोन वर्ष झाली आहेत. आता गरजू मुलांना शिकवणं, लोकांना जीवन विम्याचं महत्त्व समजावून सांगणं, शेजाऱ्या पाजाऱ्यांची कामं करणं अशा कामांमध्ये ते व्यस्त असतात. निवृत्तीनंतर अशी कामं करण्यासाठी आपल्याकडे बराच वेळ असून ती करताना आपल्याला आनंद वाटतो, असं विनोद महाजन म्हणतात. घरी बसून बोअर होणं किंवा आपला वेळ वाया घालवण्यापेक्षा अशा कामांमध्ये वेळ घालवला तर तो सत्कारणी लागतो, असंही ते म्हणतात.

आयकर विभागातून निवृत्त झालेल्या आरुती रॉय या निवृत्तीनंतरचं आयुष्य खूप आनंदाचं असल्याचं सांगतात. त्या आणि त्यांच्या बहिणीने विवाह केलेला नाही. त्यामुळे आपण आता कोणासाठी ओझं झालो नाहीत आणि आपणही कोणाला उत्तरदायी नाही याबद्दल त्यांना समाधान वाटतं. आम्ही वयाने वृद्ध झालो असलो तरी मनाने आजही तरुण आहोत, असं त्या सांगतात. ◆◆◆

*निवृत्तीनंतरचा काळ सुख-शांतीत जावा, असं प्रत्येकालाच वाटतं. पण, त्यासाठी रिटायरमेंट प्लॅनिंग करणं फार महत्त्वाचं आहे.*

## प्लॅनिंग रिटायरमेंटचं

रिटायरमेंटच्या प्लॅनिंगच्या बाबतीत बहुतांश लोक फारसे उत्साही असल्याचं दिसत नाही. कारण, तशा कामासाठी कोणत्याही प्रकारचा इन्सेंटिव्ह मिळणार नसतो. पण, एक गोष्ट लक्षात ठेवावी की, रिटायरमेंटचं प्लॅनिंग फक्त पैशांशी संबंधितच असता कामा नये. पैशांपेक्षाही आयुष्याच्या या टप्प्यावर आपण अधिक सुखासमाधानाने कसे जगणार आहोत, हा विचार जास्त महत्त्वाचा आहे. त्यासाठी काही प्रश्न स्वत:ला विचारावेत. रिटायरमेंटनंतर आपला मोकळा वेळ कसा जाणार आहे? कोणत्या ठिकाणी आपण फिरण्यासाठी जाणार आहोत, आरोग्याच्या समस्या निर्माण झाल्यास त्या आपण कशा पद्धतीने सोडवणार आहोत, जो पैसा आपण जमा केला आहे तो कोणाला देणार आहोत, या टप्प्यावर आपल्या उत्पन्नाचा स्त्रोत काय असेल, असे प्रश्न स्वत:ला विचारावेत.

वेळेचं नियोजन करणं सर्वात महत्त्वाचं आहे. बरेच लोक निवृत्तीनंतर हैराण होतात. कारण त्यांनी आपल्या मोकळ्या वेळेचं काय करायचं याचं नियोजन केलेलं नसतं. त्यामुळे जे काम आपल्याला ८ ते १० तास व्यस्त ठेवेल, असं एखादं काम शोधावं. ही गोष्ट गृहिणींनाही लागू होते. आपल्या मनात वेगवेगळ्या प्रकारची समाजकार्य करण्याची इच्छा असते. पण, नोकरी-व्यवसायात व्यस्त असल्याने आतापर्यंत ते शक्य झालेलं नसतं. निवृत्तीनंतर आपल्या मनातील ही इच्छा आपण पूर्ण करु शकतो. यामुळे केवळ आपला मोकळा वेळ चांगल्या कामासाठी खर्च होईल असं नाही तर आपल्या मेंदूलाही काही ना काही खुराक मिळेल. आपले छंद पूर्ण करण्यासाठीही ही चांगली वेळ आहे. वेगवेगळ्या प्रकारचे छंद पूर्ण केल्याने आपला मोकळा वेळ व्यतीत होईल असं नाही तर त्यामुळे आपलं कौशल्यही दाखवण्याची संधी मिळेल. या वयात जुने छंद तुम्ही पूर्ण करु शकता किंवा एखाद्या छंदाच्या पूर्ततेसाठी क्लास सुरु करण्याचाही पर्याय आपल्यासमोर आहे.

आपल्यापैकी बरेच लोक नोकरीच्या दरम्यान ज्या ठिकाणी फिरण्याची इच्छा असते त्यापैकी अनेक ठिकाणी फिरु शकलेले नसतात. आता निवृत्तीनंतर ती संधी आपल्यापाशी आहे. अर्थात



त्यासाठी लागणाऱ्या पैशांची तरतूद आधीच करुन ठेवायला हवी.

आपण आरोग्य विमा घेतला असेल तर निवृत्तीनंतरच्या काळात आरोग्याच्या तक्रारींविषयी फारशी काळजी करण्याचं कारण नाही. पण, नोकरीच्या दरम्यान त्याची व्यवस्था केली नसेल तर प्लॅन घेण्यासाठी थोडा उशीर झाला असं म्हणावं लागेल. याचं कारण सेवानिवृत्तीच्या काळात वेगवेगळे आजार आपल्याला घेरण्याची शक्यता असते. त्यामुळे रिटायरमेंटचं प्लॅनिंग करतानाच त्याचा विचार जरुर करावा.

आपल्याकडे पैसा, संपत्ती जमा झाल्यानंतर एक महत्त्वाचं काम करणं आवश्यक आहे. तिचं वाटप कोणामध्ये करायचं हे ठरवून तसं मृत्यूपत्र तयार केलं पाहिजे. भारतात अशा प्रकारचे विचार फार कमी लोकांकडे आहेत. पैशांच्या बाबतीत शिखरावर असणाऱ्या लोकांनीही आपल्या संपत्तीचं वाटप त्यांच्या नातेवाईकांमध्ये चोखपणे केलेलं दिसत नाही. जिवंतपणीच मृत्यूपत्र न केल्यास आपल्यामागे नातेवाईकांमध्ये संपत्तीवरुन वाद होण्याची शक्यता जास्त असते.

या काळात नियमित उत्पन्नासाठीही काही गोष्टी लक्षात घेण्याची गरज आहे. निवृत्तीनंतर आपल्यासाठी मोठं घर ठेवून त्याच्या देखभालीतच सारा वेळ घालण्याऐवजी ते घर भाड्याने देऊन आपल्या नियमित उत्पन्नाची व्यवस्था करता येईल. आपल्याकडील पैसे मुलं-मुली, नातेवाईक, ट्रस्ट, मंदिरं यांना आधीच दान करुन टाकू नयेत. त्यासाठी इच्छापत्र तयार करणं हा एक चांगला मार्ग आहे. रिटायरमेंटनंतर आपलं आयुष्य उत्साहाने भरलेलं आणि शांतीपूर्ण असलं पाहिजे. त्यासाठी आपल्या रिटायरमेंटचं प्लॅनिंग योग्य असलं पाहिजे. ◆◆◆

## ज्येष्ठांनो, काढ्याचे अतिसेवन टाळा

कोरोनापासून बचाव करण्यासाठी व्हॉटसअप आणि फेसबुकवर व्हायरल होणारे अर्धवट माहितीच्या आधारे दिल्या जाणाऱ्या सूचनांवर विश्वास ठेवून काही नागरिक औषधी काढा आणि औषधी गुण असलेल्या मसाल्यांचा अधिक वापर करत आहेत. हे उपाय अन्य आजारांना निमंत्रण देत आहेत. काढ्यात वापरण्यात येणारे मीरे, डालचिनी, लसून, कोरफड आदींचा वापर किती आणि कसा करावा याबाबत लोकांना ठोस माहिती नाही आणि ते आपल्या सोयीने त्याचा वापर करत आहेत. आहारतज्ज्ञ आणि आयुर्वेदाच्या तज्ञांच्या मते, दालचिनीत हेपेटॉक्सिन नावाचे तत्त्व असते. त्याचे अधिक सेवन हे आरोग्यासाठी हानीकारक आहे. दालचिनी, सूंठ आणि लवंग याचे संतुलित प्रमाण हे संसर्गाला रोखण्यासाठी फायद्याचे आहे. परंतु अर्धवट माहितीच्या आधारे त्याचा प्रयोग हानीकारक ठरु शकतो. ◆◆◆




सुखांतिका
डॉ. नेहा वैद्य
nehamvaidya1105@gmail.com



कार्तिकेयाचा जन्म याच दिवशी झाला म्हणून हिला 'कुमार पौर्णिमा' असे देखील म्हणतात. पावसाळा संपलेला असतो, निरभ्र आकाश, टिपूर चांदणं, आणि त्यात पौर्णिमेचा चंद्र तेजाळत असतो. हे सगळं मनाला खूप सुखावत रहातं.

असं म्हणतात की कोजागिरीच्या रात्री लक्ष्मी विचारत असते, को जागर्ति ? ( कोण जागं आहे?) लक्ष्मी म्हटलं की धन, पैसा हेच डोक्यात येतं. ते तर व्यवहारातलं चलन आहे. पण लक्ष्मी म्हणजे श्री शोभा. लक्ष्मीची अनेक रूपं आहेत. ती वित्तलक्ष्मी, गुणलक्ष्मी, सौंदर्यलक्ष्मी, भावलक्ष्मी आहे. ती लक्ष्मी जागृत माणसांना मिळते. आळशी, प्रमादी किंवा झोपाळू माणसं प्रत्यक्ष समोर आलेल्या लक्ष्मीलाही वाढवू शकत नाहीत. आपल्याकडे घराघरात श्रीसुक्त म्हंटलं जातं. ती लक्ष्मी म्हणजे आदिशक्ती, आदिमायेचं अलौकिक रूप आहे. ऋग्वेदाच्या कालखंडात हे तयार झालेलं श्रीसुक्त आहे ज्यात लक्ष्मीचं सत्यरूप उलघडून दाखवलं आहे. 'श्री' चे अनंत अर्थ आहेत. त्यातला एक अर्थ सौंदर्य असा आहे. सौंदर्य बाहेरचं आज आहे उद्या नसणार. पण इथे स्वामींनी छान सांगितलंय.

**रूप लावण्य अभ्यासिता न ये।**
**म्हणून धरावी सोय। अगांतुक गुणांची॥**

म्हणजेच अंतरंगाचं सौंदर्य महत्वाचं. म्हणून आपल्याकडे पुरुषाला 'श्रीमान' आणि स्त्रीला 'श्रीमती' असं म्हणतात. म्हणून प्रत्येकाचं अंतरंग उत्तम हवं. अशी ही लक्ष्मी विचारतेय को जागर्ति? आपण खरंच जागे आहोत का? भगवद् गीतेतला दुसरा अध्याय , श्लोक 69 मधे सांगितलंय,

**या निशा सर्वभूतानां तस्यां जागर्ति संयमी।**
**यस्यां जाग्रति भूतानि सा निशा पश्यतो मुनेः॥**

याचा अर्थ, जिकडे सगळे झोपलेले असतात, तिथे मी जागा असतो. सामान्य जन(आपण) विषयांच्या ठिकाणी जागे असतात. पण आत्मसुखाच्या जागी तो ( परमेश्वर) जागा असतो.

उत्तिष्ठत जाग्रत प्राप्य वरन्निबोधत।कठोपनिषद म्हणजे उठा आणि जागे व्हा. आपण जागे होतो मग उठतो. माणूस म्हणून जन्माला आलेले आहोत, मग आता आपलं हित साधून घ्या.

या दिवशी आटवलेले मसाला दूध चंद्राला नैवेद्य दाखवून पितात. वैज्ञानिकदृष्ट्या कोजागिरीच्या दिवशी चंद्र सोळा कलांनी प्रकाशित झालेला असतो. चंद्रकिरण अतिशय शीतल असतात.शरद ऋतुत पित्ताचा त्रास होतो,आणि दूध पित्तशामक आहे.

खरं तर आयुर्वेदाप्रमाणे चंद्राच्या प्रकाशात चांदीच्या पात्रात पाणी घेऊन ते ठेवायचं. आणि ते प्यायचं. त्याने शरिरात सौम्यता निर्माण होते. त्याला हंसोदक असं म्हणतात. हंसाला जर नीर-क्षीर ( दूध आणि पाणी) वेगळं करता येतं. तसं आपल्याला पण चांगलं वाईट,सत्-असत् मधला फरक कळला पाहिजे.

या दिवशी जेष्ठापत्य पूजन असतं. म्हणजे घरातल्या मोठ्या अपत्याला ओवाळतात. सरकी असलेला कापूस आणि दूर्वांनी त्याला ओवाळतात. कापसासारखा म्हातारा आणि दूर्वांसारखा चिवट हो, असा दीर्घायुष्याचा आशीर्वाद त्याला देतात.

काही ठिकाणी या दिवशी तांदळाची खीर बनवून तीचा नैवेद्य दाखवतात. प्रत्येक प्रांतात ही वेगवेगळ्या नावाने, पद्धतीने साजरी केली जाते.गुजराथ मधे 'शरद पौर्णिमा', ओरीसा मधे ' कुमार पौर्णिमा ' , वृंदावन मधे ' रास पौर्णिमा ' शेतकरी वर्गामध्ये हा दिवस उत्साहाने साजरा केला जातो. निसर्गावरच्या कृतज्ञतेपोटी कोकणात नवान्न पौर्णिमा साजरी करण्याची प्रथा आहे. ह्या दिवशी शेतकऱ्यांच्या घरी नविन धान्य आलेले असते. भात, नाचणी , वरी अशा प्रकारच्या धान्याची पूजा करण्याचा दिवस म्हणजे नवान्न पौर्णिमा .

या दिवशी जागरण करतात, जागं असणं म्हणजे अवधान देणं, लक्ष देणं. आतमधे जागरूकता हवी. हल्ली कोदागिरीला शहरांमधे संगित, नृत्याचे कार्यक्रम आयोजित केले जातात. खाणं पिणं गप्पा-गोष्टी चालू असतात. अनेक जण गड-किल्ल्यांवर जाऊनही कोजागिरी साजरी करतात. गडावर गेल्यावर त्या हिरकणीला आठवतां का? जी त्या कोजागिरीच्या चंद्राच्या प्रकाशात आपल्या मुलाच्या ओढीने तो कडा उतरून खाली गेली होती. तिच्यात वीरलक्ष्मी बघतां आली पाहिजे. राष्ट्राच्या हितासाठी नित्य जागे आहात का ?

ऋतूनुसार वातावरणात, सभोवती होणारे बदल माणूस अनादी काळापासून टिपत आला आहे. आणि त्यानुसार त्यानं आपल्या जीवनाची घडीही तयार केली आहे. निसर्गाच्या बदलांना प्रतिसाद देण्यासाठीच आपल्या बहुतेक सण , उत्सवांची निर्मिती झाली. कोजागिरी पौर्णिमाही ह्याला अपवाद नाही.

# काबुलमधले 'ते' दिवस !

## (भाग 5)



मनोमनी
माधवी कुलकर्णी
madhavi_kulkarni03@yahoo.com



बाहेरचे दार वाजले. बाबा परतले होते. त्यांचे घरमालकांशी काय बोलणे झाले, याची मला उत्सुकता होती. "रेडीओ अफगाणवरील बातम्या खऱ्या आहेत. आज ओढवलेल्या या परिस्थितीची कारणे व वस्तुस्थिती मी जाणून घेतली आहे. ते तुला थोडक्यात सांगतो," बाबा म्हणाले.

1973 साली अफगाण राजा महंमद झहीर शहा, यांची सत्ता, त्यांच्या पंतप्रधान असलेल्या पुतण्याने म्हणजे सरदार महंमद दाऊद खानने उलथवली. शहा आपल्या कुटूंबासह इटलीला पळून गेले. दाऊद खान 'राजा' न होता 'प्रेसिडेंट ऑफ अफगाणिस्तान' झाले. त्यांच्यावर कम्युनिझमचा प्रभाव होता. त्यादृष्टीने त्यांनी देशात सुधारणा आणणे सुरु केले. मुख्यतः त्यांनी, ज्या जमीनदारांकडे अधिकची जमीन होती, ती त्यांनी 'जमीन नसलेल्यांना' वाटून देणे सुरु केले. शिवाय राजा झहीर खानने सुरु केलेल्या सुधारणा उदा. स्त्री शिक्षण, स्त्री स्वातंत्र्य, राजकीय हक्क, निवडणूका वगैरे गोष्टीही सुरु ठेवल्या. हजारो वर्षांच्या परंपरावादी मानसिकतेच्या अफगाणींना हे मान्यच नव्हते. गरीब विद्यार्थी, बेरोजगार, कामगार-शेतमजुर यांची नाराजी, महागााई, भ्रष्टाचार, दडपशाही, बाहेरच्या देशांची ढवळाढवळ यामुळे जनता विद्रोही बनत चालली होती.

दाऊद खानच्या PDPA पार्टीचे, वैचारिक द्वंद्वामुळे विभाजन झाले. 'परचम' गटात शहरी, बुद्धिजीवी, अमीर - मध्यमवर्गीय मंडळी होती. 'खल्क' गटात भटक्या जमाती, टोळया, शहराबाहेरील गरीब मंडळी होती. दोन्ही गटांची स्वतंत्र मुखपत्रे होती. स्वतः प्रसिडेंट दाऊद खान 'परचम' गटाचे होते.

एका घटनेने ठिणगी पडली व वडवानल पेटला ! मीर अकबर खैबर या नेत्याचा खून झाला. दाऊद सरकारने लगेच स्वतःबद्दल सफाई दिली. पण, संशयाची सुई दाऊद सरकारवरच होती. अनेक नेत्यांचा समज होता की, आपल्यालाही असेच संपवणार ! कारण, दाऊदची करणी तशीच होती. विरोधकांना तुरुंगात पाठवी वा फाशी देई किंवा संपवी ! मीर खैबरच्या दफनविधीसाठी मोठया संख्येने लोक काबुल बाहेरुन आले. विधीनंतर त्यांच्या संतापाचे रुपांतर प्रचंड मोर्च्यात झाले (जवळपास 20 हजार लोक) त्यात विद्यार्थी, मजूर, कामगारांसमवेत अनेक नेते जे दाऊदकडून अपमानीत झाले होते, तेही सामील होते. या मोर्चाचे म्होरके होते - नूर महंमद तरक्की, हाफिजुल्लाह अमीन, बाब्रक कार्मल वगैरे. हा मोर्चा पाहून दाऊद सरकार गडबडले. त्यांनी दमनशाही करीत अनेकांना तुरुंगात डांबले, त्यात बाब्रक कार्मेलही होते. हफीबुलाह अमीन यांना घरातच नजरकैदेत ठेवले. पण, झाले असे की, घरात बसून अमीन यांनी दाऊदला संपवून, सत्ता ताब्यात घेण्याचा कट शिजवला ! या कटात पोलीस दलातील, सैन्यातील, वायुदलातील 'खल्क मेंबरर्सना' सामील करुन घेतले गेले.

प्रसिडेंट दाऊदला गुप्तचरांनी ही बातमी दिली होती. पण, दाऊदने त्याकडे दुर्लक्ष केले, जे त्याच्या शेवटी जीवावर बेतले. सकाळची 9 वा. ची वेळ ! दाऊद आपल्या सहकाऱ्यांसोबत तुरुंगातील कैद्यांचे काय करायचे, यावर चर्चा करीत होते. त्यात व्हाईस प्रेसिडेंट, मिनिस्टर ऑफ डिफेन्स अॅन्ड इंटिरिअर, एअर फोर्स कमांडर अशा महत्वाच्या व्यक्ती होत्या. त्याचवेळी प्रसिडेंट पॅलेस बाहेर, अफगाण आर्मीचे रणगाडे येऊन उभे राहिले. त्यांनी सांगितले, 'आम्ही प्रेसिडेंटच्या रक्षणासाठी आलो आहोत'. पण, दाऊदने त्यांना हाकलून दिले. ते पॅलेसबाहेरील रस्त्यावर विविध ठिकाणी उभे राहीले. चौका - चौकात रणगाडे, सशस्त्र, ए के 47 धारी सैनिक उभे राहीले, सुट्टी असल्याने नागरिकांची रस्त्यावर वर्दळ होती. घड्याळात जसे 12 वाजले तसे रणगाड्यांनी आपल्या तोफा पॅलेसवर रोखल्या व त्या धडाडू लागल्या ! मुख्य सरकारी इमारतींबाहेरील रणगाडे ही धडाडू लागले ! प्रसिडेंटला रणगाड्यांचे खरे रूप समजले ! दाऊदला शरण येण्यास आज्ञा झाली ! पण, दाऊद व त्यांचे भाऊ नईम यांनी नकार दिला ! आता आकाशातून विमानांनी रॉकेट मारा सुरु केला. नागरिक जीवाच्या भयाने पळून गेले. पाच मिनिटे बॉम्बींग, दहा मिनिटे शांतता, असे काहीतरी सुरु होते. पिस्तुले घेऊन दाऊद व नईम पॅलेसबाहेर धावले आणि उलट बाजूच्या गोळयांच्या वर्षावाने गतप्राण झाले ! दाऊदचे कुटुंबीय, पत्नी, मुले-मुली, सुना-जावई, नातवंडे, अगदी 8 महिन्यांचे बाळही मरण पावले. एकूण 18 नातेवाईक संपणे प्रेसिडेंटच्या सर्व सहकाऱ्यांना व त्यांच्या कुटुंबियांना मारुन टाकण्यात आले. तुरुंग फोडण्यात आला व सर्व कैद्यांना सोडून देण्यांत आले. त्यात बाब्रक कार्मल ही होते. रेडीओ स्टेशन ताब्यात घेऊन, विजयाची घोषणा केली गेली. एअरपोर्ट बंद केला. रात्रीच्या कर्फ्यू लावण्यात आला. हे बाबांनी थोडक्यात सांगितले. मी हतबुद्ध !

आता रस्त्यावर काही नागरिक हिंडतांना दिसत होते. चार घास खाऊन आम्हीही उत्सुकतेने बाहेर पडतो. आमच्यासारखे काही परदेशी पाहुणेही कॅमेरे घेऊन फिरतांना दिसले. समोरची नानची बेकरी सुरु करण्याची खटपट चालू होती. बहुतेक सगळ्या शोरुमच्या काचा फुटून फुटपाथवर पडल्या होत्या. आतला मोलाचा माल उघडा पडला तरी, कोणीही त्यास हात लावण्याचे धाडस केले नव्हते. मिलिटरी, पोलीस आधुनिक शस्त्रे घेऊन जागोजागी उभे होते. लोक त्यांची शस्त्रे बारकाईने पहात होते. किंचित जवळ सरकून फोटो काढून घेत होते ! चौका - चौकात रणगाडे उभे होते. कोणीतरी त्यांच्या तोफांना फुलांच्या माळा, रंगीत पताकांनी सजवले होते ! काही पुरुष-मुले रणगाडयांवर चढून, कुतुहलाने आंत पहात होते. काहीजण त्यावर निवांत ऊन खात बसले होते ! आधुनिक पेहरावातल्या, बुरख्यातल्या या स्त्रिया मुला-बाळांसह फिरताना दिसल्या ! काहीजण मोटारीतून फिरत होते. नागरिक खरंच निर्भयपणे वावरत होते. सरकारी इमारती, प्रसिद्ध एरिना हॉटेलचे प्रचंड नुकसान झाले होते. एक मोडका रणगाडाही दिसला. नंतर गप्पांमध्ये कोणीतरी फायटर प्लेनचे भग्नावशेष पाहिल्याचे सांगितले.

पॅलेसला तर जत्राच भरली होती जणू ! मिनार टॉवरच्या वरच्या भागास बॉम्बमुळे मोठे भगदाड पडले होते ! काचा फुटलेल्या खिडक्या दरवाज्यातुन लोक वाकुन-वाकुन आतले वैभव निरखीत होती. मौल्यवान कार्पेट, फर्निचर, खुर्च्या, झुंबरे दिसत होती. काहीजणांना रक्त दिसले म्हणे ! सुंदर महालची दशा झाली होती. काळाचा महिमा अन् काय ! थोर इतिहासकार असे म्हणतात, 'या दिवसांपासून अफगाणिस्तानचे काळे पर्व सुरु झाले ! ' सत्ता संपत्तीच्या हव्यासात सामान्य माणूस हिंसेत - कौर्यात भरडला जातो. आपण युद्ध संपविले नाही तर युद्ध आपल्याला संपवते, हेच खरे !

# मोबाईलचे वेड - चिंतनाचा विषय

सध्याचे युग हे मोबाईलचे युग आहे. पूर्वी चैन म्हणून वापरला जाणारा मोबाईल आज जीवनावश्यक गरज बनला आहे. अगदी शाळकरी मुलांपासून ते वृद्ध नागरिकांपर्यंत सर्वांसाठीच मोबाईल ही अत्यावश्यक वस्तू बनली आहे. पूर्वी शाळकरी मुलांना मोबाईल पासून दूर ठेवता येत होते पण सध्याच्या ऑनलाइन शिक्षणाच्या काळात तर मोबाईल हा वर्ग आणि मोबाईलची स्क्रीन हाच फळा बनला आहे. शिक्षणासाठी मोबाईल हे महत्वाचे साधन बनले आहे. ऑनलाइन शिक्षणासाठी पालकांनी मुलांना मोबाईल दिलेला असला तरी बहुतांशी मुले त्याचा दुरुपयोगच करत असल्याचे एका पाहणीत निष्पन्न झाले आहे. मोबाईलवर ऑनलाइन गेम खेळणे, सोशल मीडियाचा अतिरेकी वापर करणे, वेगवेगळ्या प्रकारचे ऍप्स, पोर्न व्हिडिओ पाहणे हेच उद्योग मुले करताना दिसत आहे. मुलांना मोबाईलचे अक्षरशः वेड लागले आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. मुलांचे हेच मोबाईल वेड चिंतनाचा विषय बनला आहे.

देशातील एका प्रख्यात मानसोपचार तज्ज्ञाने सांगितले आहे की त्यांच्याकडे उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांपैकी 40 टक्के रुग्ण हे मोबाईल किंवा इंटरनेटमुळे 'सोशल एंझायटी डिसऑर्डर' चे शिकार झालेले असतात. या आजाराने ग्रस्त झालेले मुले एकमेकांना प्रत्यक्ष भेटण्यास घाबरतात त्याऐवजी ते एकांतवासात राहणे पसंत करतात. एखादी व्यक्ती आपल्याला भेटायला आल्यावर ती आपली उणीव दाखवून देईल अशी भीती या मुलांना वाटत असते. या मुलांमध्ये आत्मविश्वासाची कमी असते. मोबाईलच्या आहारी गेलेल्या या मुलांना आपल्या आई - वडिलांशी संवाद साधायलाही वेळ मिळत नाही. मोबाईलमुळे मुले हिंसक होत आहेत. अनेक मुले मोबाईल गेमच्या आहारी गेले आहेत. मोबाईलवर गेम खेळू न दिल्याने काही मुलांनी आत्महत्याही केल्या आहेत. याचाच अर्थ मोबाईलचा मानवी मनावर इष्ट आणि अनिष्ट परिणाम होत आहे. धक्कादायक असे की मोबाईलच्या अतिवापरामुळे चोरी आणि गुन्हेगारीच्या प्रमाणातही वाढ होत आहे. मोबाईल कार्ड रिचार्ज करण्यासाठी किंवा मोबाईल बिल भरण्यासाठी मुलांनी चोरी केल्याचाही काही घटना घडल्या आहेत. मोबाईल वापराचा जसा मुलांवर मानसिक परिणाम होत आहे तसा शारीरिकही होत आहे. मोबाईल वापरताना एकाच जागी बसून राहिल्याने मुलांची शारीरिक हालचाल होत नाही. परिणामी मुलांची स्थूलता वाढत आहे. स्थूलता वाढल्याने मुले अनेक आजारांना बळी पडत आहेत. सतत मोबाईल जवळ असल्याने मुलांचे डोळे दुखतात. दृष्टी कमी होते. 6 ते 18 वयोगटातील 26 टक्के मुलांना दृष्टिदोष असल्याचे नुकतेच एका पाहणीत आढळून आले आहे.



मोबाईलमुळे मुले मैदानी खेळच विसरुन गेले आहेत. मैदानावर जाऊन खेळण्याऐवजी मुले मोबाईलवरच इंटरनेट गेम खेळत असतात. मोबाईलमुळे मुले शारीरिक आणि मानसिकरित्या पंगू बनत आहेत एकूणच मोबाईल वापराचा परिणाम जेवढा चांगला तेवढाच वाईटही आहे म्हणूनच पालकांनी आपल्या मुलांच्या मोबाईल वापरावर मर्यादा आणावी. आपली मुले मोबाईलच्या आहारी जाऊ नये याची काळजी पालकांनी घ्यावी. कोणत्याही गोष्टीचा अतिरेक वाईटच असतो हे लक्षात घेऊन मुलांनी मोबाईलचा अतिरेक टाळावा.

श्याम बसप्पा ठाणेदार, पुणे
9922546295

# शब्दगंधार - कवी जयंत भावे

**माझे परम मित्र कवी व ज्येष्ठ साहित्यिक श्री. जयंत नारायण भावे यांचा 'नक्षत्राचं देणं काव्यमंच साईराजे पब्लिकेशन, पुणे' मार्फत नुकताच प्रकाशित झालेला कवितासंग्रह 'शब्दगंधार' माझ्या हाती आला आणि मी त्यांच्या प्रेमात पडलो. त्याचे पहिले कारण पुस्तकाची पुठ्ठा बांधणी व पुस्तकांच्या नावाला सार्थ करणारी मुखपृष्ठ निर्मिती "शब्दगंधार शब्द मुळी संगीताशी जोडला गेला आहे. मुखपृष्ठाची खालची बाजू व तिचा डावा कोपरा तंतुवाद्य व सप्तसूरांचा संकेत देणारी अन्य वाद्ये आणि निसर्ग वैभवाच्या पार्श्वभूमीवर त्यातून वरच्या दिशेने तरंगत बाहेर पडणाऱ्या संगीत लहरी. मुखपृष्ठ पाहूनच अंतरंगाची कल्पना आली. जयंत भावे मुळात शिक्षकी पेशातून आलेले. ज्ञान-विज्ञान व निसर्गाशी घट्ट नातं असलेले कवी. संगीत व गायकीची जाण असल्याने आपल्या कवितांतून हळूवार तरल शब्दांची पेरणी करून त्यातून भावभावांनी व शब्द सुरांची उधळण करणारे किमयागार.**

जयंतराव यांनी शब्दसुंगध, "इंदधनू', 'भावतरंग' (चारोळी संग्रह), 'काव्यसौरभ', 'संवेदना' अशा एकाहून एक चढे काव्यसंग्रह या आधीच रसिक वाचकांपुढे ठेवून नावलौकिक मिळविला आहे. आधीच्या काव्यसुधेचे पान करून नव्या काव्यसंग्रहाची आतुरतेने वाट पहात असलेल्या वाचकांसाठी "शब्दगंधार" हा काव्यसंग्रह पर्वणी ठरणार हे सांगणे न लगे.

भावे सर हे काव्य जगतातील जुन जाणते रसिक कवी आहेत. आधीच्या स्वनामधन्य कवींच्या घाटणीची कविता ते लिहितात. त्यामुळे त्यांच्या कविता वाचताना बालकवी, बा.भ.बोरकर, कुसुमाग्रज, यशवंत इ. कवी श्रेष्ठांचे अभंग वाचताना संत तुकाराम, नामदेवादीची आठवण होते. त्यांच्या कवितेत संस्कृतप्रचुर शब्द अधिक प्रमाणात आढळतात. त्यांच्या बहुतांश कविता गेय स्वरूपाच्या आहेत. 'शब्दगंधार' कविता संग्रहात त्यांनी भक्तिगीते, प्रेमगीते, स्फुर्तीगीते, गोळण, लावणी, पोवाडा इत्यादी काव्य प्रकारांचा लिलया वापर केला आहे. निसर्गकाव्य हा कवीचा स्थायीभाव आहे. तरीही कवीने सामाजिकतेचे भान सोडलेले दिसत नाही. याचा अर्थ त्यांची कविता सर्वस्पर्शी आहे.

प्रत्येक मंगलकार्याशी श्री गणेशाची आराधना केली जाते. सश्रद्ध जयंतरावही याला अपवाद नाही. याच भाषेतून त्यांनी 'श्री. गणेश वंदन' या भक्तिगीताने काव्यसंग्रहाचा प्रारंभ केला आहे. 'संतसंग' हा अभंगही भक्तिभावनेतून लिहिला आहे. महाराष्ट्र ही संत महात्म्यांची, शुरवीर रत्नांची जननी आहे. या महाराष्ट्राला विसरता येणे शक्य नाही. 'महाराष्ट्र माझा' ही कविता त्याच भावनेतून कवीने लिहिली आहे. महाराष्ट्राचा अभिमानास्पद इतिहास या कवितेत वर्णिला आहे.

"या मातीत अवतरली संत-महंतांची मांदियाळी,
इथे वाहते अध्यात्म-संस्कृतीची गंगाजळी।"

अमृतातेही पैजा जिंकणारी मराठी ही महाराष्ट्राची जनभाषा तिचा कवीला अभिमान वाटणे स्वाभाविक आहे. 'माय मराठी मनाचा मुजरा' कवितेत मराठीची समृद्धी सांगताना ते लिहितात..

"महणी, वाक्प्रचार, शब्द कोडी, वृत्तालंकारांनी मराठी नटलेली,
रसाळ अभंग-लावणी, गीत, ओव्या कंठी रुळलेली।

'अनुभव गुरु' कवितेतून अनुभवाचे महत्त्व विशद केले आहे.

डॉ. अब्दुल कलाम हे भारताला लाभलेलं एक वरदान! कवीने या महान व्यक्तिमत्त्वाच्या कार्याचा लेखाजोखा 'जय हो डॉ. अब्दुल कलाम' व्यक्तिचित्रणात्मक कवितेत अतिशय सुंदररीतीने मांडला आहे.

"विद्युलतेपरी प्रखर मति जगा आली प्रचिती,
तेजीनिधी सुपुत्र नावाड्याचा झाला राष्ट्रपती।"

'पहावा देव' कवितेत देवाचे सर्वव्यापकत्व सोदाहरण वर्णिले आहे व 'पाऊस आला, पाऊस आला' व 'झिम्माड पाऊस आला' या दोन्ही कवितांत पावसाची विविध रूपे वर्णन केली आहेत. त्यांची 'निसर्गवैभव' ही कविता निसर्गातील निळाई, हिरवाई, पाने, फुले, लता-वेली, निर्झर, पक्षी आदींची मुक्त वावर कथन करणारी आहे.

'हिमशिखरांनी मुकुट घातले शिरी चंदेरी,
प्रातःकाळी रविकिरणांनी वर्खविले सोनेरी।'

कवीने 'वर्खविले' हे नामवाचक क्रियापद नव्याने योजिले आहे. बालकवींना भुरळ घालणाऱ्या श्रावणमासाला हा कवी तरी अपवाद कसा ठरेल? 'श्रावणमासी' ही कविता पहा...

"श्रावणी हिरवळ दाटे जिकडे तिकडे,
त्या हिरवळींवर वनराणी नटून उभी वाटे।"

'बाळ कान्हा गोकुळी आला' व 'यशोदे ऐक' या दोन्ही कविता कान्हाच्या आगमनाप्रित्यर्थ गोकुळात केलेली तयारी व कान्हाच्या खोड्यांची कैफियत मांडणाऱ्या आहेत.

'काव्याच्या बागेत', 'कविते तू अशी', 'मला कविता जमत नाही' या तिन्ही कवितांत कवी कवितेच्या संदर्भातील आपले अनुभव कथन करतो. 'प्रेम धुंद ही हवा' आणि 'इथेच आणि या ठिकाणी' या कविता गाजलेल्या प्रेमगींतांची आठवण करून देतात. 'बंदिस्त प्रेम', 'दोन फुले वाहून ये', 'कळलेच नाही', 'वेड' याही प्रेमकविता आहेत. भावकवी जयंत भावे यांची 'आज माझ्या लाडल्याला' ही कविता मुलांच्या हळदीचा प्रसंग रंगवणारी भावनाप्रधान कविता आहे. कवीने हळद मुहुर्ताच्या बारीकसारीक विधींचे सर्वांग सुंदर वर्णन केले आहे. हे एक हळदीचे गेय गीत आहे.

'झाड' ही कविता जीवनाचं तत्वज्ञान सांगणारी बोधप्रद कविता आहे. वाट संपत नसते, चालणारा संपतो, हे माहित असूनही शेवटपर्यंत चालत रहायचं हीच आपली नियती.

'नवा काळ' ही कवितासुद्धा बदलत्या काळात काळाशी जुळवून घेण्यातच आपली भलाई आहे, असा व्यावाहारिक सल्ला देणारी व सद्यस्थितीची जाण करून देणारी वास्तववादी कविता आहे. कवीने केलेलं निरिक्षण, चिंतन व मनन त्यांच्या अभिव्यक्तितून जाणवत राहते. 'मंजुर आहे' ही कविता समाधानानं कसं जगावं याचं गणित मांडते. सुख-दुःखाच्या वजाबाकीत जे नशिबी येईल ते आनंदाने स्वीकारायचं पूर्ण-अपूर्णतेचा हिशोब मांडण्यात काही एक अर्थ नाही. जे उणे आहे तेही मंजुर करीत जगायचं. हा कवीचा सकारात्मक सूर यातून दिसून येतो. 'जंगले गेली कुठे?' ही सामाजिक भान जागवणारी कविता खूपच विचारप्रवण आहे. वारेमाप होणारी वृक्षतोड माणसांपुढील यक्ष प्रश्न आहे. अर्थात याला कारणीभूत माणूसच आहे. हेही तितकेच खरे. पुढील ओळी चिंतनीय आहेत.

'क्षीण झाल्या नद्या निळ्या, सुकले झरे सावळे,
निष्पर्ण झाडांच्या फांद्यावरी आक्रंदती कावळे।'




इंग्रजी नव वर्षाने धुमाकूळ घातला असून आम्ही आमच्या संस्कृतीला विसरत चाललो की काय असा संभ्रम होत आहे. हिंदू नववर्ष स्वागत याचे कवितेत चैत्र शुद्ध प्रतिपदा हा आमच्या हिंदू नववर्षाचा प्रथम दिवस. हे सांगून नववर्षाचे स्वागत कसे करावे. अतिशय सुंदर रीतीने समजावून सांगितले आहे. ते कसे पहा..

"सजवू घर-दारे पुष्पमाला नवपल्लव तोरणांनी,
शोभिवंत करू अंगणे सुंदर रांगोळ्यांनी।"

'आक्रोश भारतमातेचा' या कवितेत देशाला कोरोना व भ्रष्ट राजकारणी या दोन विषाणूंची लागण लागली आहे. असे कवी ठामपणे सांगतो. देशभक्तांनी स्वातंत्र्यासाठी आपले सर्वस्व पणाला लावले. मात्र भ्रष्टाचारी राजकारण्यांनी सत्येसाठी अनीतीचा बाजारच मांडला. याची कवीला खंत वाटते. त्यासाठी कवी 'अखंड भारत चिरायु होवो' या कवितेत म्हणतो...

"आता तोडून बेड्या अन्यायाच्या अश्रू जनतेचे पुसू,
देऊन त्यांना नवी दिशा, नवी उमंग जागवू।"

कवीने श्री हनुमंताला पाळणा व महर्षी श्री वेदव्यासांची आरती या दोन रचना अतिशय भक्तिभावपूर्ण रीतीने शब्दबद्ध केल्या आहेत. भक्तजनांनी त्यांचे नित्य पारायण करावे. इतक्या उच्चकोटीच्या त्या आहेत.

कवीवर्य जयंत भावेसरांच्या सर्वच कविता वाचनीय व संग्रहणीय आहेत. विषय वैविध्य व भाषिक सौंदर्य जयंतरावांच्या काव्याची ठळक वैशिष्ट्ये आहेत. या कवितांचा वास्तवता हा आधार असून त्याला प्रतिभेची किनार आहे. काव्यात गोडवा, माधुर्य व प्रासादिकता असल्याने त्या वाचकाला गुंतवून ठेवतात. मग ते काव्य कवीने न राहता बहुजन हिताय बनून जाते. आंग्ल लेखक मॅथ्यू अर्नोल्ड कवितेची परिभाषा व्यक्त करताना म्हणतो, "Poetry is nothing less than the most perfect speech of man that in which he comes nearest to being able to utter the truth" कवीवर्य जयंत भावे यांच्या कविताबऱ्याच अंशी वरील विधानाशी मेळ बसणाऱ्या आहेत. आजपर्यंत त्यांच्या काव्यसंग्रहाचे रसिक वाचकांनी गर्मजोशीने स्वागत केले आहे. "शब्दगंधार" या काव्यसंग्रहाचेही तितक्याच उत्कंठतेने रसिक स्वागत करतील याचा मला विश्वास वाटतो.

जयंत भावे यांनी मला परीक्षण करण्याची संधी दिल्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो आणि त्यांनी काव्यलेखनाचा व्यासंग निरंतर सुरु ठेवून साहित्य निर्मितीत भर घालावी अशी अपेक्षा करून शुभेच्छा देतो. "शब्दगंधार" काव्यसंग्रहाला अत्यंत देखण्या रूपात व शुद्ध स्वरूपात प्रकाशित केल्याबद्दल प्रकाशक प्रा. राजेंद्र दशरथ सोनवणेसरांना मनःपूर्वक शुभेच्छा!

शुभंवतु.

**- प्रा. डॉ. राम नेमाडे**
मो.नं. 8767803535

■■■

# 'कवितेची लोभस भावचित्रे'

मी कविता लिहिताना एक फुलपाखरू अपूर्ण राहिलेल्या कवितेच्या पानावर येऊन बसलं आणि जाताना त्या अपूर्ण कवितेच्या पानावर सोनेरी ठसा उमटवून गेलं...

मनात उमटणारं, हुरहूर वाटणारं, आपलं असं खास प्रथम हलकेच हृदयाशी संवाद करतं, काहीबाही ठरवतं, त्यात योग्य बदल करीत काळजावर उमटतं आणि यथावकाश एका नाजूक क्षणाला शब्दांच्या रुपानं अलगद कागदावर उमटतं. त्या शब्दांना लाभले असतात फुलपाखरांचे नाजूक पंख आणि कल्पनेचे अनेक भावविभोर ठसे उमटवीत ते फुलपाखरू पुन्हा अदृश्य होतं. ते उमटलेलं हळुवार काही म्हणजेच 'कविता'. वरील कवितेत प्रत्यक्ष कवयित्री काय म्हणते पहा... 'त्या अपूर्ण कवितेच्या पानावर सोनेरी ठसा उमटवून गेलं' किती तरल आणि नाजूक. अशा अनेक भावविभोर कविता आपल्याला पानापानात गवसू लागतात.

कविता ही अल्पाक्षरी असावी. जेव्हा एखादा कवी कवितेत तोलूनमापून शब्द वापरतो तेव्हा ती कविता उत्तम असते असे मानले जाते. कमीतकमी शब्दात मोठ्या अवकाशाचा आशय सांगणारी कविता वाचक रसिकाला मनापासून भावते. अशा कवितांचे सर्वत्र स्वागतच होते.

एकदा माझ्या कवितेच्या डायरीत
एक मोरपीस मिळालं
तेव्हापासून माझ्या मनाचं आभाळ
गच्च भरुन आलं.

कवितेची लोभस भावचित्रे आपल्या नेमक्या शब्दातून व्यक्त करणाऱ्या कवयित्री निर्मला आलेगावी कुप्पस्त यांचा नुकताच प्रकाशित झालेला 'व्यक्त' हा सुंदर कविता संग्रह वाचण्यात आला. निसर्गातले अविष्कार, नात्यांची नाजूक वीण, प्रेम, विरह, आठवणी असे सारे विषय कवयित्री निर्मलाताईंना आपल्या एकूण 81 कवितांतून समर्थ शब्दकळातून रेखाटले आहेत. यातील बहुतांशी कविता मुक्तछंदातल्या असूनही कुठेही कृत्रिमता त्यात दिसत नाही हे विशेष. निर्मलाताईंची शब्दशैली सहज सुंदर, सोपी आणि नेमकी आहे. या कवितासंग्रहात तीन भाग आहेत. व्यक्त, कवितेच्या कविता आणि विखुरलेले काव्यक्षण (अल्पाक्षरी). या तीनही भागात विखुरलेल्या कवितांमधून कवयित्री विविध विषयांवर वाचकांशी मुक्त संवाद साधते.

सुप्रसिद्ध कवी, गीतकार श्री अशोक बागवे यांनी या संग्रहाची पाठराखण केली आहे. 'व्यक्त' होणे याबद्दल ते ते काय म्हणतात पहा "व्यक्त होते ती व्यक्ती..! चांगल्या तऱ्हेने व्यक्त होणे, त्याला अभिव्यक्ती म्हणतात. शब्द हा अवकाशाचा गुण आहे. तो अर्थासहित कवितेत मुरतो."

एखादा प्रसंग, घटना बघताना सर्वसामान्य माणूस बघून सोडून देतो, विसरून जातो. मात्र संवेदनशील मन लाभलेल्या एका कवीमनाला तीच घटना, तो प्रसंग मात्र अस्वस्थ करतो. दुसरीकडे त्याचे चिंतन, मनन चालूच असते. आणि एखाद्या अत्युच्च क्षणी त्या प्रसंगाची प्रतिक्रिया, कविता, कथा अथवा




लेखातून कागदावर अवतरते. हे व्यक्त होणे सर्वांनाच जमत नाही. काही जणांना जमतं ते खरोखरच नशीबवान असतात.

एकदा तिनं ठरवलं,
तिच्या संवेदनाशील मनाला
तिच्या हाडामांसाच्या
शरीरापासून वेगळं करायचं
आणि
जगरहाटीचा अर्थ लावायचा..

जीवनाकडे त्रयस्थपणे बघताना कवयित्री अगदी सहजपणे व्यक्त होताना इथे दिसते.

मला पटलेली तुझी ओळख
किती अपूर्ण अन् किती चुकीची होती..

एकीकडे प्रेमविषयक जाणिवा, संवेदना रेखाटत असताना स्त्री-पुरुष नात्यांमधली नाजूक वीण, दुरावा, त्यातले ताणेबाणे देखील कवयित्रीने नीटपणे उलगडून दाखवले आहेत हे मला महत्त्वाचे वाटते. वास्तववादी कविता देखील अनेक आढळतात. उदा. समीप, चादर, व्यक्त, डेबिट-क्रेडिट, उद्रेक, शेवटी, अपेक्षा इत्यादी.

कवयित्री निर्मलाताई यांचे आईबाबा कर्नाटकातले. निर्मलाताईंची मातृभाषा कन्नड आणि ज्ञानभाषा मराठी. पुढे शिक्षणाच्या आणि नंतर नोकरीच्या निमित्ताने त्या मुंबई सारख्या महानगरात कायमच्या स्थायिक झाल्या. खऱ्या अर्थाने मुंबईकर झाल्या. कॉलेज जीवनात कधीतरी त्यांना लेखनाचा छंद जडला. उत्तम वाचनातून त्यांनी तो जाणीवपूर्वक वाढवला. या प्रवासामध्ये अनेक मान्यवरांचे मौलिक मार्गदर्शन त्यांना लाभले. पुढे तर कार्यक्रमाच्या निमित्ताने ज्येष्ठ कवी डॉ. महेश केळुस्करांशी परिचय झाल्यावर मुंबई आकाशवाणी येथे त्यांना कविता वाचनाची संधी मिळाली. त्या संधीचे त्यांनी सोने केले. विविध वृत्तपत्रांतून, मासिकांतून त्यांच्या कविता प्रसिद्ध होऊ लागल्या. या कवितांचा पुढे संग्रह काढावा अशी त्यांच्या मनात इच्छा होतीच मात्र तो योग काही येत नव्हता. तो आला अगदी अवचितपणे. 'सृजनसंवाद'चे प्रकाशक, कवी गीतेश शिंदे यांच्याशी निर्मलाताईंचा परिचय झाला. गीतेश यांनी त्यांच्या कवितांची निवड करून त्याचे संपादन, त्यावर संस्करण केले आणि 28 मे 2021 रोजी 'सृजन संवाद' प्रकाशनातर्फे निर्मलाताईंचा हा पहिला कविता संग्रह ज्येष्ठ कवी डॉ. महेश केळुस्कर यांचे हस्ते प्रकाशित झाला. आपल्या मनोगतातून त्या वाचकांशी संवाद साधतात "गेल्या चाळीस वर्षांत लिहिलेल्या या कवितांना छापील कोंदण मिळायचा योग आत्ता आला."

या संग्रहाचे आणखीन एक वैशिष्ट्य म्हणजे सुप्रसिद्ध कवयित्री, समीक्षिका प्रतिभा सराफ यांची मर्मग्राही प्रस्तावना या संग्रहाला लाभली आहे. प्रतिभाताई एके ठिकाणी म्हणतात. "कवयित्री निर्मलाताईंनी आपल्या कवितांमध्ये फारसे अलंकार वापरलेले नाहीत. काही कवितांमधून उपमा अलंकार दिसतो. पण तरीही बहुतेक कविता अलंकारांशिवाय आंतरिक सौंदर्याने नटलेल्या साध्या आणि तरीही सकस अशा मुक्तछंदातील आहेत. या कविता आपल्याला निखळ काव्यानंद देतात यात शंकाच नाही."

'सृजन संवाद' प्रकाशनाने निर्मलाताईंच्या कवितांना योग्य न्याय दिला आहे. संग्रहाची निर्मिती दर्जेदार झाली आहे. संग्रहाचे मुखपृष्ठ बोलके आहे आणि ते अश्विनी खटावकर यांनी कल्पकपणे साकारले आहे.


माझ्या कवितांची काही पानं,
वाऱ्यावर उडाली.
काही तुझ्या पायांपाशी येऊन पडली.

असे सहज सुंदर आणि आत्मीयतेनं लिहिणाऱ्या कवयित्री निर्मला आलेगावी-कुप्पस्त यांच्या पुढील लेखन प्रवासास माझ्या खूप शुभेच्छा.

**- रामदास खरे, ठाणे.**

व्यक्त (कविता संग्रह)
कवयित्री : निर्मला आलेगावी-कुप्पस्त
प्रकाशक : सृजनसंवाद, ठाणे.
पृष्ठे : 104, मूल्य : रु. 175/-
घरपोच पुस्तकासाठी संपर्क : 9004102767

# "A फक्त तूच" चे टीजर पोस्टर लाँच



टीव्ही मालिकांमधून घराघरात पोहोचलेले चिन्मय उदगीरकर आणि सुरुची आडारकर "A फक्त तूच" या चित्रपटात एकत्र येत आहेत. एका वेगळ्या नात्याची गोष्ट या चित्रपटातून उलगडणार असून दसऱ्याच्या मुहूर्तावर चित्रपटाचं टीजर पोस्टर श्रीमंत दगडूशेठ गणपतीच्या चरणी लाँच करण्यात आलं. याप्रसंगी चित्रपटातील कलाकार आणि तंत्रज्ञ मंडळी उपस्थित होती.

**संडे स्पेशल**

जयदीप फिल्म प्रॉडक्शनची निर्मिती असलेल्या चित्रपटाची निर्मिती आणि दिग्दर्शन रंगनाथ बबन पाचंगे करत आहेत. चित्रपटाची कथा त्यांचीच असून, प्रफुल एस. चरपे यांनी पटकथा, संवाद लेखन केलं आहे. राजू भोसले क्रिएटिव्ह प्रोड्यूसर, मंगेश भिमराज जोंधळे कार्यकारी निर्माता आहेत तर रणजित माने यांनी छायांकन, सागर गायकवाड यांनी कला दिग्दर्शनाची जबाबदारी निभावली आहे. चिन्मय उदगीरकर आणि सुरुची आडारकर यांच्यासह या चित्रपटात माधुरी पवार, शिल्पा ठाकरे, तेजस्विनी शिर्के, ऋषिकेश वाम्बुरकर, गीत निखारगे यांच्या भूमिका आहेत. प्रियांका दुबे यांनी वेशभूषा तर समीर कदम हे रंगभूषाकार म्हणून काम पाहणार आहेत.

समुद्राची उसळलेली लाट, गुलाबाचं फुल हातात घेतलेल्या त्याच्या हातावर तिनं ठेवलेला हात टीजर पोस्टरमध्ये दिसत आहे. तर कारण आपलं नातं वेगळं आहे. ही चित्रपटाची टॅगलाईन आहे. त्यामुळे एक वेगळी आणि रोमँटिक कथा चित्रपटातून पहायला मिळेल असा अंदाज टीजर पोस्टरवरून करता येतो. नोव्हेंबर महिन्यात चित्रपटाचे चित्रीकरण सुरु होणार आहे. टीव्ही मालिकांमधून प्रेक्षकांच्या पसंतीची पावती मिळवलेले चिन्मय उदगीरकर आणि सुरुची आडारकर ही फ्रेश जोडी चित्रपटाचं वैशिष्ट्य ठरणार आहे.

# तुका म्हणे आता

**सुंदर ते ध्यान, उभे विठेवरी**
**कर कटावरी ठेवोनिया ।।1।।**
**तुळसी हार गळा, कांसे पितांबर**
**आवडे निरंतर तेची रुप ।।2।।**
**मकर कुंडले तळपती श्रवणी**
**कंठी कौस्तुभमणी विराजीत**
**।।3।।**
**तुका म्हणे माझे हेची सर्व सुख**
**पाहीन श्रीमुख आवडीने ।।4।।**



'सुंदर ते ध्यान' या गाण्याचा भावार्थी संवाद. या गाण्याचे अभंगकार आहेत तुकाराम महाराज. विठ्ठलाचं हे सुंदर ध्यानस्थ रुप पाहून. आपलं मन मंत्रमुग्ध होतं. आपल्याला त्यातून आत्मानंद मिळतो. मस्तकापासून पायापर्यंत ही मूर्ती तेजाने परिपूर्ण अशी आहे. या मनोभावन मूर्तीने कटेवर दोन हात ठेवले आहेत.

अशा या अलौकिक, स्वयंभू, सक्षम विठुरायाच्या गळ्यात. तुळशीच्या सुगंधीत, आकर्षक, हिरव्यागार माळा आहेत. विठ्ठलाचे सौंदर्य पितांबर नेसलल्याने सजलेले आहे. त्यामुळे या मूर्तीकडे पाहताच आपण थक्क होऊन जातो. अशा या भगवान, परमात्म्याच्या कानात डुलणारी कुंडले आहेत आणि ती वाऱ्याच्या झुळकीने हलून आपल मन वेधून टाकत आहेत. त्याच वेळी गळ्यातील कंठाजवळ देवाजीचा कौस्तुभमणी असून तो शोभेवंत दिसत आहे. म्हणून तुकाराम महाराज आपल्या विठ्ठलाचे वर्णन करताना म्हणतात. माझ्या जीवनाचे सर्व सुख पांडुरंगाच्या चरणापाशी व्याकूळले आहे. अस हे पावन श्रीमुख मी आवडीने बघतो. त्यात तल्लीन होऊन, समरस होतो. हे माझ्या प्रेरणेच निवासस्थान आहे. हे संत तुकारामांनी किती समर्पक शब्दात लिहिले आहे. विठ्ठलाच्या मूर्तीकडे बघताना आपल्याला हाच अनुभव येतो.

- कवी ॲंड रुपेश पवार
संतवाणी अभ्यासक
9930852165

# वेडाची दुनिया



**मनतरंग**
सौ. नूतन बांदेकर :9773445808

'मला वेड लागले प्रेमाचे..."

'टाईमपास' मधील हे गीत म्हणजे केवळ टाईमपास नसून वेड म्हणजे काय? हा विचार करायला लावणारे आहे. वेड म्हणजे ध्यास, वेड म्हणजे श्वास, वेड म्हणजे भक्ती, वेड म्हणजे शक्ती, वेड म्हणजे धुंदी तसंच वेड म्हणजे मस्तीही. एकंदरीत वेड म्हणजे तनामनावर राज्य करणारी एक अद्भूत गोष्ट! प्रत्येकाला कसले ना कसलेतरी वेड असतेच असते. आणि अशी वेडी माणसेच जगण्याच्या पलिकडे जगतात. प्रत्येक वेडया माणसाची स्वतःची अशी एक वेगळी दुनिया असते. 'आपले वेड हेच आपले जग' असे मानणारी मंडळी तेच वेड उराशी कवटाळून आयुष्यभर आपल्याच धुंदीत जगतात. ना कशाची चिंता ना कशाची पर्वा!

मानवजातीला वरदान ठरलेले अनेक ध्येयवेडे आपल्याला ठाऊक आहेत. परंतु तत्कालिन समाजाने वेडे ठरवूनही जे अवलिये आपल्या वेडाशी अखेरपर्यंत प्रामाणिक राहिले, त्यांच्या त्या वेडाची किंमत त्यांच्या नंतरच्या काळात सर्वांना कळली. अशा अवलियांची नावे त्या त्या क्षेत्रात आजही श्रेष्ठत्वास आहेत. ॲरिस्टॉटल, सॉक्रेटीस हे तत्ववेत्ते, पिकासो, राजा रविवर्मा हे चित्रकार, नेल्सन मंडेला, डॉ. आंबेडकर हे समाजसुधारक, नेपोलियन, हिटलर हे महायोद्धे, हे आणि असे अनेक मातब्बर केवळ असामान्यच आहेत.

खर सांगायचं तर प्रत्येक कलाकार, लेखक, कवी, खेळाडू हा वेडा असतोच. फक्त वेडेपणाचे प्रमाण कमी जास्त असते एवढंच! त्यापैकी काही मंडळी आयुष्यभर आपले वेड जपतात, तर काही आपल्या वेडाला वेळीच विवेकाचा बांध घालतात. वेड जपणारे असामन्य ठरतात, तर वेडापासून दूर होणारे सामान्यच राहतात.

फिरत्या चाकावरती देसी, मातीला आकार,
विठ्ठला तू वेडा कुंभार...

विठ्ठल भक्तीत डुंबलेला गोरा कुंभार हा तर वेड्यांचा वेडा! संत मीराबाई श्रीकृष्णाच्या प्रेमभक्तीत वेडी झालीच होती ना! शिवरायांच्या मावळ्यांचे तरी दुसरे काय? स्वराज्य स्थापनेचे आणि ते रक्षिण्याचे वेडंच तर त्यांना सतत उर्जा देत होते. नाही तर कुठे मुघल बादशहाची ताकद आणि कुठे शिवरायांचे मावळे! पण मावळ्यांना झपाटले होते स्वराज्य प्रेमाने आणि म्हणूनच 'वेडात मराठे वीर दौडले सात...' म्हणताना आजही अभिमानाने ऊर भरुन आल्याशिवाय राहत नाही.

संभाजी राजांना तर धर्मनिष्ठेचे वेड होते. एवढा क्रूर छळ सहन करुन मृत्यू पत्करणे म्हणजे धर्मवेडंच नव्हे का? भगतसिंग, राजगुरु, सुखदेव हे ही तसेच कडवे देशभक्त! त्यांचे देशप्रेमाचे वेड सर्वश्रुत आहे. गांधी, आगरकर, साने गुरुजी या साऱ्यांनी तर सत्यप्रियतेचे वेड घेवून जगासमोर आदर्श ठेवला. खरंच कुणाला कोणते वेड असेल हे सांगता येत नाही. पहा कुणाला शब्दसुरांचे, कुणाला रंगरेषांचे, कुणाला गंधसुगंधांचे, कुणाला खाण्याचे तर कुणाला खिलवण्याचे वेड असते. कुणाला अभ्यासाचे तर कुणाला खेळाचे, कुणाला भटकंतीचे तर कुणाला पावसात भिजण्याचे, कुणाला नाटक सिनेमे पाहण्याचे, तर कुणाला नविन कलाकृती निर्माण करण्याचे, कुणाला लिहिण्याचे, तर कुणाला वाचनाचे. व्यक्ती तितक्या प्रकृती म्हणतात, तसेच व्यक्ती तितके वेडाचे प्रकार असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

पण एक खरे की माणूस आपल्या वेडात कधी वेडा होतो हे ज्याचे त्याला ठाऊकही नसते. वेड लागले, वेडा झाला, हे नेहमी लोकच ठरवतात. मात्र चांगल्या गोष्टींचे वेड लागले तरच त्याचे परिणाम विधायक होतात. अन्यथा मनोरुग्णांच्या संख्येत भर पडते. गंमत म्हणजे जेव्हा लोक एखाद्याला वेडा ठरवितात तेव्हा तर तो 'मी वेडा नाही' हे स्पष्ट करण्याच्या मूडमध्ये नसतोच. कारण तो स्वतःला विसरून त्या गोष्टीशी म्हणजे आपल्या वेडाशी एकरूप झालेला असतो. त्यामुळे "लोक काय म्हणतात?" हे त्याच्या खिजगणतीतही नसते. तो एका आत्मिक समाधानात आकंठ बुडालेला असतो. त्याला भौतिक जगाची गरजच उरत नाही. ब्रह्मानंदी टाळी लागते आणि जीवनाचे सार्थक झाल्याचा अनुभव येतो. म्हणूनच आपल्याला मिळालेल्या मनुष्यजन्माचे जर सार्थक करायचे असेल तर जगण्याला वेडाची जोड असायलाच हवी. ज्यामुळे दैनंदिन सुख दुःखापासून निश्चितच सुटका मिळू शकेल. हे सगळे खरे असले तरी वेडे होण्याचा वेडेपणा करताना वेड घेवून पेडगावला जावू नये. कारण वेड हे ठरवून घेता येत नाही. ती मनाची एक अवस्था असते, तन्मय होण्याची, त्यात हरवून जाण्याची! म्हणूनच प्रत्येकाला स्वतःचे असे एक जग असायलाच हवे, स्वतःला झोकून देण्यासाठी जिथे तो स्वतः 'राजा' असेल कदाचित लोक त्याला 'वेडा' म्हणतील.

# हे मना... (मनाच्या श्लोकांचे संक्षिप्त विवेचन)

**असे हो जया अंतरी भाव जैसा । वसे हो तया अंतरी देव तैसा ।**
**अनन्यास रक्षीतसे चापपाणी । नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ।**

भाव या शब्दाचा अर्थ भगवंतावरचे अखंड प्रेम व अविचल श्रद्धा असा श्रीसमर्थांना अभिप्रेत आहे. परमेश्वराचे निर्गुण निराकार रुप हे भक्ताच्या मनातील भावानुसार सगुण रुप घेते. राम, कृष्ण, शिव, विष्णु, दुर्गा अशा विविध देव-देवतेच्या उपासना करुन एकच सत्य ते वेगवेगळ्या रुपात जाणण्याचा प्रयत्न करतात. ज्यांची भगवंतावर अपार निष्ठा असते व जे सर्वस्वी त्याच्यावर अवलंबून असतात. भगवंताशिवाय आपला कुणी कैवारी नाही अशी ज्यांची धारणा असते अशा भक्तांचे भगवंत कायम रक्षण करतात.

**सदा सर्वदा देव सन्निध आहे । कृपाळूपणे अल्प धारिष्ट पाहे ।**
**सुखानंद आनंद कैवल्यदानी । नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ।**

परमेश्वर सतत आपल्या सोबत असतो नव्हे आपल्या अंतरातच वास करुन राहातो. तो संकटे निर्माण करुन आपली परीक्षा पाहतो. यात त्याचा कठोरपणा नसून त्याची कृपाळू वृत्ती दिसून येते. श्रीसमर्थांच्या मते या कसोटीस जो उतरतो त्यास सुख, आनंद आणि कैवल्यप्राप्ती होते. अशारितीने भगवंत भक्ताची कधीच उपेक्षा करत नाहीत.

**- डॉ. वैशाली वावीकर**




करवा चौथ हिंदू धर्मीय महिलांचा सर्वात महत्वाचा व्रत मानले जाते पंजाब, मध्यप्रदेश, गुजरात, उत्तर प्रदेशसहित जवळपास संपूर्ण भारतात हे व्रत उत्साहाने केले जाते. महिला आपल्या पतीच्या दीर्घ आयुष्यासाठी हे व्रत करतात व दिवसभर उपवास करून संध्याकाळी चंद्राची पूजा करून आपल्या पतीच्या हाताने पाणी पिऊन हे व्रत सोडतात.

करावा चौथ या व्रताबद्दल फार कमी लोकांना माहित आहे, या दिवशी एक पत्नी आपल्या पतीसाठी केवळ चौथ देवीकडे सौभाग्याचे वरदान मागत नाहीत, तर या व्रत मध्ये संपूर्ण सृष्टीला समाविष्ट केले जाते, ही सृष्टी पाच तत्त्वापासून बनलेली आहे, यामध्ये अग्नी, जल, वायू, पृथ्वी आणि आकाश हे तत्त्व आहेत. हे पाचही तत्त्व साक्षी मानून हे पूजा केली जाते. करवा म्हणजेच मातीचा करवा यामध्ये एक (मातीचे कलशाप्रमाणे भांडे) असते हे पृथ्वी तत्त्वाचे प्रतीक आहे आणि या व्रतामध्ये महिला सकाळी करवामध्ये म्हणजेच त्या मातीच्या भांड्यामध्ये पूजेसाठी पाणी भरले जाते आणि त्या भांड्यातील पाण्याने पत्नी चंद्राच्या पूजेनंतर पतीसोबत पाणी पिते. याच करव्याला व्रताचा पहिला साक्षी म्हणजे पृथ्वी तत्त्व मानले गेले आहे. करवामध्ये म्हणजे एका मातीचे भांड्यामधे पाणी ठेवले जाते, जल तत्त्वाचे प्रतीक आहे. करवा चौथ पूजेमध्ये सौभाग्यवतीच्या व्रताचा दुसरा साक्षी पाणी आहे. हेच पाणी पिऊन व्रत सोडले जाते. महिला या व्रतामध्ये दिवसभर उपवास करून रात्री चंद्राची पूजा करतात. चंद्र आकाशात विराजित आहे. चंद्राच्या माध्यमातून तिसरा साक्षी आकाशाला व्रतामध्ये समाविष्ट केले जाते. या कारणामुळेही चंद्राची पूजा केली जाते. हे आकाश तत्त्वाचे प्रतीक आहे. एक गोल आकाराची चाळणी घेऊन आणि त्यामधून चंद्र आणि पतीचे दर्शन घेताना चाळणीत दिवाही ठेवला जातो. हे अग्नी तत्त्वाचे प्रतीक आहे. या व्रताचा चौथा साक्षीदार अग्नी आहे. या व्रताची पूजा हि घरा मध्ये करत नाही , एखाद्या खुल्या मैदानावर किंवा आपल्या घरच्या छतावर केली जाते. मोकळ्या हवेत. हे वातावरणच वायू मंडळाचे प्रतीक असते. जे या व्रताचा पाचवा साक्षी मानले गेले आहे. अशाप्रकारे एक सौभाग्यवती महिला हा व्रत संपूर्ण सृष्टीला या व्रतामध्ये समाविष्ट करून व त्यांना साक्षी मानून पूजा करते या पंचतत्त्वाचा समावेश इतर कोणत्याही व्रतामध्ये दिसून येत नाही. यामुळे हे व्रत अत्यंत खास मानले गेले आहे.

एके काळी एक सुंदर राणी विरवती होवून गेली. ती सात भावात एकच बहिण होती. तिचा पती एका दीर्घ आजाराने आजारी होता. तिने हे व्रत केले. दिवसभर पतीच्या आयुष्यासाठी आपले सर्व काही देवाचरणी ठेवले. रात्री ती चंद्राच्या प्रतीक्षेत वाट बघू लागली तिच्या भावांना तिची हि अवस्था बघवेना त्यांनी चंद्राची नकली प्रतिमा उभी करून तिचा उपवास सोडवला. त्याचवेळी तिचा पती मरण पावला ती रडत राहिली. त्याच वेळी एका देविरुपी स्त्रीने तिला दर्शन दिले. तिने हा उपवास परत कर असे सुचवले. राणी भक्ती भावाने हे व्रत करू लागली. सायंकाळ झाली चंद्र दर्शन घेतले व नंतर मृत पतीचे दर्शन घेतले तोच चमत्कार घडला. तिचा पती पुनरजीवित होवून ठणठणीत तिच्या समक्ष उभा झाला. ह्या सर्वांमुळे राणी फारच खुश झाली ती दरवर्षी नित्य नियमाने, उपवास करू लागली. या दंतकथेनुसारच महीला हा उपवास मोठया उत्साहाने करतात.

# शिक्षकांचा नेहमीच सन्मान व्हावा

फक्त शिक्षक दिनाच्या दिवशीच शिक्षकांचा का म्हणून सन्मान करायचा ? वर्षभरात असे अनेक दिवस किंवा महत्वाचे दिन आहेत ज्यावेळी शिक्षक मित्राचा सन्मान करता येऊ शकते. मुलींच्या शिक्षणाची ज्योत पेटविणारी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जन्म दिनी राज्यातील तमाम महिला शिक्षिकाचा गौरव गावस्तरापासून देशस्तरापर्यंत केला जावा. त्यानिमित्ताने महिलांनी शैक्षणिक क्षेत्रात किती उतुंग भरारी मारली आहे हे समाजाला कळेल.

मुलीसाठी पहिली शाळा उघडणारे क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंती दिनी राज्यातील शिक्षण प्रणालीत उत्कृष्ट काम करणाऱ्या शिक्षकापासून तर अधिकारी मंडळीपर्यंत सर्वांचा सत्कार करावा. तळागाळात व खेडोपाडी जीव ओतून काम करणारे अनेक शिक्षक आणि अधिकारी आहेत, त्यांची दखल यानिमित्ताने निश्चितपणे घेतली जावी. स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीच्या दिवशी तरुण तडफदार युवक शिक्षकाचा सन्मान करावा. आधुनिक तंत्रज्ञान शिक्षणाचा वापर करून राज्यातील अनेक युवा शिक्षकांनी शिक्षणाच्या क्षेत्रात क्रांती घडवून आणली अश्या शिक्षकांचा यावेळी सन्मान करणे त्यांना प्रेरित करण्यासारखे होईल. शैक्षणिक क्षेत्रात कथा, कविता आणि इतर साहित्य लिखाण करणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे, हे निश्चितच अभिमानास्पद बाब आहे. वास्तविक पाहता शिक्षकांचा जास्तीत जास्त संबंध वाचन आणि लेखनाशी निगडित आहे. पण सारेच शिक्षक काही साहित्य निर्मिती करु शकत नाहीत. परंतु जे कोणी शिक्षक मंडळी नवसाहित्य निर्मितीसाठी योगदान देतात त्यांचा सन्मान महाकवी कालिदास यांच्या जन्मदिनी करून त्यांच्या साहित्याचा गौरव करणे शक्य होऊ शकते.

भारतीय स्वातंत्र्य दिन आणि प्रजासत्ताक दिन या दिवशी फक्त ध्वजारोहण न करता शाळा स्तरावर ग्रामपंचायत किंवा शाळा व्यवस्थापन समिती मार्फत शाळेतील उत्कृष्ट शिक्षकांचा गौरव सर्वासमक्ष करणे ही बाब



देखील शिक्षकांसाठी सन्मान देणारे ठरेल. राजमाता जिजाऊ यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्यावर उत्तम संस्कार केले म्हणून स्वराज्य निर्मितीची कल्पना सत्यात साकारण्यात आली. त्यांच्या जयंतीनिमित्त शैक्षणिक क्षेत्रातील अश्या थोर माता जे की शिक्षिका आहेत आणि त्यांचे पाल्य जीवनात यशस्वी झाले आहेत अश्याचा सत्कार करणे आवश्यक आहे. ज्यांच्या अंगी नेतृत्व गुण चांगले आहेत असे शाळाप्रमुख मुख्याध्यापकाचाही सन्मान भारताचे पोलादी पुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंती दिनी करण्यात आल्यास यथोचित होईल असे वाटते. काही वेळा शाळेत विविध स्पर्धाच्या माध्यमातून विद्यार्थी तालुका, जिल्हा, विभाग, राज्य किंवा देश स्तरावर चमकतात तेंव्हा त्या विद्यार्थ्यासोबत त्यांचे मार्गदर्शक असलेल्या शिक्षकांचाही गौरव केला तर चांगले प्रोत्साहन मिळेल. सोशल मिडियात असे वाचण्यात आले की पाच सप्टेंबरला शिक्षक दिन का साजरा करायचा आम्ही, डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांनी शैक्षणिक क्षेत्रात मोलाची अशी काय कामगिरी केली त्यापेक्षा महात्मा फुले यांच्या जयंती दिनी हा दिवस साजरा केला जावा ह्या मतप्रवाहामध्ये बरीच मंडळी दिसून येतात. अशा आणि इतर मत असणाऱ्या लोकांसाठी मी नमूद केलेले वरील पर्याय सर्वोत्तम आहे असे वाटते. एखादे दिवस साजरे करीत असताना त्या दिवसामागची संकल्पना स्पष्ट करून घेणे अत्यंत महत्वाचे आहे. तसे तर शिक्षकांचा सन्मान फक्त एकाच दिवशी न करता वेळप्रसंगी रोजच त्यांच्या कार्याचा सन्मान व्हायला हवा. कारण शिक्षकांमुळे देशाची चांगली पिढी घडत असते म्हणून शिक्षकांना प्रोत्साहन देण्यासाठी त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप मारण्यासाठी नियमित सन्मान व्हावा, असे वाटते.

नासा येवतीकर, स्तंभलेखक, धर्माबाद,
9423625769

# महाविकास आघाडीतील भ्रष्ट नेत्यांच्या घोटाळ्यांचे दहन करणारच-किरीट सोमय्या



अंबरनाथ: राज्यातील महाविकास आघाडीतील मंत्र्यांचे घोटाळे बाहेर काढल्याशिवाय गप्प बसणार नाही आणि कुणाच्याही धमक्यांना घाबरणार नाही असा परखड इशारा भाजपा नेते माजी खासदार किरीट सोमय्या यांनी अंबरनाथला दिला.

अंबरनाथ भारतीय जनता पक्षाच्या वतीने आयोजित कार्यकर्ता मेळाव्यात उप मुख्यमंत्री अजित पवार, मंत्री अनिल परब, अनिल देशमुख यांच्यासह घोटाळे करणाऱ्यांविरोधात श्री.सोमय्या यांनी जोरदार हल्लाबोल केला. भाजपा प्रदेश सरचिटणीस गुलाबराव करंजुले-पाटील, कल्याण जिल्हाध्यक्ष शशिकांत कांबळे, शहराध्यक्ष अभिजित करंजुले-पाटील, राजेश कौठाळे, शहर महिलाध्यक्षा सुजाता भोईर आदी पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

मंत्री हसन मुश्रीफ यांच्याविरोधात तक्रार करण्यासाठी जाताना खूप त्रास सहन करावा लागला पण अखेरीस तक्रार दाखल केली आणि त्यामुळेच मुश्रीफ यांच्या कामाचा ठेका रद्द करावा लागल्याचे श्री. सोमय्या यांनी सांगितले.

राज्यात आणि मुंबईत सध्या ड्रग माफियांचा उद्रेक वाढला असून त्याप्रकरणी कारवाई सुरु झाली आहे. महाविद्यालयाच्या दारात हे लोण पोहोचल्याची भीती व्यक्त करून तरुण पिढीला वाचवायचे प्रयत्न सुरु आहेत, असे असताना मंत्री नवाब मलिक यांनी एनसीबीचे संचालक समीर वानखेडे यांच्यावर टीका करून त्यांना तुरुंगात टाकण्याची धमकी दिली होती. त्याबाबत श्री. सोमय्या यांनी चीड व्यक्त केली. राष्ट्रवादीचे प्रवक्ते नवाब मलिक नक्की प्रवक्ते कुणाचे आहेत, असा सवाल श्री. सोमय्या यांनी उपस्थित केला. समीर वानखेडे यांच्या केसालाही धक्का लावाल तर महाराष्ट्रातील जनता ते खपवून घेणार नाही, असा इशाराही श्री.,सोमय्या यांनी दिला.

जरंडेश्वर साखर कारखान्याचे नक्की मालक कोण आहेत, हे शरद पवार आणि अजित पवार यांनी जाहीर करावे. आतापर्यंत दोन डझन नेत्यांचे घोटाळे उघड केले असून घोटाळेमुक्त महाराष्ट्र घडवणार असून त्यादृष्टीने प्रयत्न सुरु आहेत, काही प्रकरणांत यश आल्याचा दावा श्री. सोमय्या यांनी केला. प्रदेश सरचिटणीस गुलाबराव करंजुले, शशिकांत कांबळे आणि



रोटरी क्लब बदलापूर इंडस्ट्रीयल एरियाने आज बेंडशीळ, बदलापूर येथील "संगोपिता" या गतीमंद, दिव्यांग मुलांसाठी असलेल्या संस्थेमध्ये दंत व नेत्र तपासणीचे शिबीर आयोजित केले होते. रोटरी सदस्य डॉ.विद्या राठोड व डॉ.प्रियांका जैन यांनी दातांची तपासणी केली तर डॉ.प्रदीप कोळी यांनी नेत्रतपासणी केली. दंत तपासणीनंतर मुलांना टूथपेस्टचे वाटप केले. प्राथमिक नेत्रतपासणीमधे ज्यांना पुढील तपासणी वा चिकित्सेची गरज आहे ती डॉ.प्रदीप कोळी यांच्या दवाखान्यात केली जाणार आहे. आजच्या शिबिरामध्ये तेथील निवासी 40 जणांची तपासणी केली. क्लबचे अध्यक्ष राजीव दिवाण, सदस्य राजा रानडे, अमीत पाध्ये यावेळी उपस्थित होते.







